दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -६७ | बुधवार दि.१२ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-67 | Wednesday, Dt.12 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# आ. संदीप क्षीरसागर यांच्या गोटात मोठी फूट!



## सर्वसामान्य लोकांची कामे करायचीत असा निर्धार करून निवडणुकीला सामोरे जा– आ.संदीप क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी):- सर्वसामान्य लोकांची कामे करण्यासाठीच आपण निवडणूक लढत आहोत. शहरातील नागरिकांचे अनेक मूलभूत प्रश्न प्रलंबित आहेत. त्यावर आपल्याला काम करायचे आहे. निवडून आल्यानंतरही आपल्याला लोकांची कामे करायचे आहेत, असा निर्धार करून निवडणुकीला सामोरे जा. आपल्या पक्षाच्या पुरोगामी विचारधारेनुसार आपल्याला काम करायचे. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी आपले पदाधिकारी व कार्यकर्ते यांना सांगितले. मंगळवारी (दि.११) रोजी नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी बैठक बोलावली होती. यावेळी संवाद साधताना ते बोलत होते.

नगरपालिका निवडणूक प्रक्रिया चालू



### नगरपालिकेच्या अनुषंगाने आ.क्षीरसागरांनी घेतली पदाधिकारी, कार्यकर्त्यांची आढावा बैठक

झाली आहे. या निवडणुकीतील रणनीती

(उर्वरीत पान २ वर)



## अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून सतीश शेळकेंसह शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश!

बीड /प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या उंबरठ्यावर बीडच्या राजकारणात जबरदस्त उलथापालथ झाली असून बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कुशल कार्य प्रणालीला प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख सन्माननीय अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील शेकडो महत्वपूर्ण पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला आहे. काल, दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ९. ०० वाजताच्या

(उर्वरीत पान २ वर)

### शिवसेना हा मालक–नोकरांचा नाही, कार्यकर्त्यांचा पक्ष– उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे

शिवसेनेवर विश्वास ठेवून आपण आलात. आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. अवघ्या महाराष्ट्राला माहिती आहे,एकनाथ शिंदे दिलेला शब्द म्हणजे पाळलेलं वचन आहे. आपण सर्वजण तळागाळातील शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य माणसांच्या आयुष्यात सुखाचे दिवस आणण्यासाठी शिवसेनेत आलात. शिवसेना हा मालक–नोकरांचा नाही, कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. आपलं सर्वांचं शिवसेनेत मनापासून स्वागत करतो आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.'' असे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब प्रवेश सोहळ्या दरम्यान म्हणाले.

# धोंडेसाहेब तुमच्या महेश सहकारी साखर कारखान्याचे परवान्यासाठी अमित शहा यांच्याकडे जाऊ - उपमुख्यमंत्री अजित पवार

### माजी आ.भीमराव धोंडे यांचा मुंबईत अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत हजारो समर्थकांसह पक्षप्रवेश संपन्न

मुंबई - (प्रतिनिधी) राजकारण व समाजकारण करताना कुणी राजकारण्यांनी सत्तेचा गैरवापर करु नये. सत्तेचा गैरवापर फार काळ टिकत नसतो. सतत पाय जमीनीवर ठेवुन चालावे. नाशिक, अहिल्यानगर आणि आष्टी भागातही बिबटे आहेत. यांचा तर बंदोबस्त करायचाय. आष्टीतील दुसऱ्या बिबट्याचाही बंदोबस्त करु. आता बाळासाहेब आजबे व भीमराव धोंडे तुम्ही स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत विरोधी गटाला अस्मान दाखवा. कोणत्याही राजकीय पक्षात कार्यकर्त्यांच्या होणारा प्रवेश हा बेरीजच वाढवितो. कार्यकर्त्यांमुळे संघटना पक्ष वाढत असतो. मलाही पद मिळावे असे कार्यकर्त्यांना नेहमी वाटत असते. धोंडेसाहेब तुमच्या महेश सहकारी साखर कारखान्याचे लायसन्स मिळवुन देण्यासाठी आपण खंबीरपणे उभे राहु. सहकार विभागाला या संदर्भातील कार्यवाही करण्याचे सांगितले आहे. आपण अमित शहा यांना यासाठी भेटु. शिवाय तुमच्या स्वप्नातले ५०० बेडचे कन्सर हास्पीटल उभारणीसाठी सीएसआर फंड उपलब्ध करुन देऊ. बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भुषविण्याची संधी मिळाली आहे. येथे विमानतळ उभारायचेय. बीड ते हडपसर अशी रेल्वे लवकरच सुरु करुया. भविष्यात विद्युतवर बीड ते मुंबई अशी रेल्वेही सुरु करण्यात येणार आहे असे सांगत भीमराव धोंडेसाहेब तुमचा व बाळासाहेब आजबे आपल्या दोघांचाही पार्टीत योग्य सन्मान व आदर केला

(उर्वरीत पान २ वर)







### यांचा झाला राष्ट्रवादीत प्रवेश


राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत माजी आ. भीमराव धोंडे, डॉ. अजय धोंडे, राजेंद्र धोंडे, माजी सभापती नियामत बेग, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, संतोषभैय्या चव्हाण, जि. प. सदस्य सुरेश माळी, भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष दादासाहेब जगताप, अशोक साळवे, माजी सभापती अनिल जायभाये, उद्योगपती सावता ससाणे, ड. रत्नदीप निकाळजे, बाबुशेठ भंडारी, विठ्ठलराव लांडगे, शेख अस्ताकभाई, शहानवाज पठाण, मधुकर ढाकणे, बबन औटे, प्राचार्य जे. सी. शेख, संजय धायगुडे, छगन तरटे, अमोलभैय्या चौधरी, युवराज खटके, सुदामकाका झिंजुर्के, हरिभाऊ जंजीरे, पांडुरंग गावडे, अंकुश मुंढे, माजी सभापती भाऊसाहेब धनवडे, विठ्ठल डोंगर पाटील, चेअरमन बाळासाहेब शिंदे, भागवत वारे, महारुद्र खेडकर यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांचा प्रवेश झाला.

# खालापुरी येथे लाकूड वाहतूक करणारा टेम्पो पकडला

### शिरूर वनविभागाची कारवाई– मालकाविरोधात गुन्हा दाखल

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार तालुक्यातील अवैध वृक्षतोडीवर अंकुश ठेवण्यासाठी वनविभागाने धडक कारवाईचा बडगा उगारला आहे.बीड पाथर्डी रोडवरील खालापुरी येथे रविवारी (ता.९) रात्री विनापरवाना लाकूड वाहतूक करणारा एक टेम्पो वनविभागाच्या पथकाने पकडला.या कारवाईमुळे तालुक्यातील अवैध वृक्षतोड करणाऱ्या लोकांत खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार एम.एच.२३ डब्ल्यू ११४४ हा टेम्पो विनापरवाना वृक्षतोड करून लाकूड वाहतूक करत असताना वनविभागाच्या पथकाने सापळा रचून खालापुरी परिसरात अडवला.संबधित वाहन आणि लाकूड ताब्यात घेऊन व्यापाऱ्यावर पाटोदा वनपरिक्षेत्र कार्यालयात गुन्हा दाखल करण्यात आला आसुन गाडी ताब्यात घेऊन जप्त केली आहे.ही कारवाई प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी अजय देवगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या कारवाईत वनरक्षक दादासाहेब जोशी तसेच वनमजूर अंबादास लवांडे,सोपान येवले,सतीश गर्जे,गहिनीनाथ दानवले आणि भिमराव सवासे यांनी सहभाग घेतला.पथकाने तात्काळ वाहन आणि अवैध लाकूड जप्त करून पुढील तपास सुरू केला आहे.तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर विनापरवाना वृक्षतोड सुरू असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली होती. या पार्श्वभूमीवर वनविभागाने घेतलेली ही कारवाई ही एक इशारा कारवाई असल्याचे समजते.वनविभागाच्या सूत्रांच्या माहितीनुसार अवैध वृक्षतोडीमध्ये काही स्थानिक व्यापारी आणि दलालांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.या संदर्भात पुढील चौकशी सुरू असून दोषींवर कठोर कारवाई केली जाणार आहे असे वनविभागाकडून सांगण्यात आले.



**तालुक्यात कोठेही वृक्षतोड होत असेल तर तात्काळ वनविभागाला फोन करून माहिती द्या.आम्ही तत्काळ कारवाई करू असे वनरक्षक दादासाहेब जोशी यांनी सांगितले.**

# पहिल्या पत्नीने जाब विचारला म्हणुन तिच्यावर ‘वस्तऱ्याने’ वार केला




**केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

केज/प्रतिनिधी

केज येथील क्रांतीनगर भागात राहणाऱ्या पती-पत्नी मधील किरकोळ वाद विकोपाला गेल्यामुळे,पहिली पत्नी माहेरी असताना पतीने अवघ्या चार महिन्यांत दुसऱ्या महिलेसोबत लग्न केल्याची धक्कादायक घटना केज येथे घडली असून.पहिल्या पत्नीने आपल्या पतीला याचा जाब विचारला असता, पतीने तिच्या

(उर्वरीत पान २ वर)

# शिरूरचा भुमिपुत्र मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विश्वस्त पदी बिनविरोध !



मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार येथील रहिवासी प्रा .सुभाष दिगंबर दगडे यांची नुकतीच मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विश्वस्त म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली .बांगडी व्यावसाईक तथा कौटोंबिक अर्थशास्त्र कोलमडलेल्या दगडे कुटूंबातील सुभाष दगडे यांना शालेय जिवन वस्तिगृहात घालवले मात्र जिद्द आणि चिकाटीच्या बळावर घरचे अर्थशास्त्र बदलून टाकायचे या विचाराने पछाडले ,परिस्थिती चा विचार न करता शिक्षण क्षेत्रात झेप घेत थेट सांगली येथे मथुभाई गरवारे महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असतांना देखील अनेक उपक्रमात व्याख्यान

(उर्वरीत पान २ वर)

## गेवराई शहरातून सौ. शितलताई महेश दाभाडे यांना प्रचारादरम्यान वाढता प्रतिसाद



**सामान्य घरात जन्म घेऊन प्रस्थापितांना टक्कर देण्यास सज्ज**

गेवराई (प्रतिनिधी) :- महेश अण्णा दाभाडे यांना कुठलाही राजकीय वारसा नाही ते एका सामान्य घरात जन्माला आलेले असताना प्रस्थापितांना कडवी टक्कर देण्यास सज्ज असून गेवराईकारांच्या गळ्यातील ताबीज बनले आहेत. महेश दाभाडे हे नगराध्यक्ष असताना गेवराईकरांनी त्यांच्या कामाची झलक पाहिलेली आहे. यावेळी गेवराई नगरपरिषद चे नगराध्यक्ष पद ओपन महिलेला सुटल्याने त्यांच्या पत्नी सौ. शितलताई महेश दाभाडे ह्या नगराध्यक्षपदाची निवडणूक लढत

(उर्वरीत पान २ वर)

# वडवणी मध्ये धनंजय मुंडे समर्थकांचा व ओबीसी समाजाचा तीव्र आंदोलनाचा व रस्तारोकोचा इशारा

### वडवणी शहरामध्ये माजी मंत्री तथा आमदार धनंजयजी मुंडे यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक

वडवणी /प्रतिनिधी

सविस्तर वृत्त असे दि. ०७-११-२०२५ रोजी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी एक जाहीर पत्रकार परिषद घेऊन स्वत:च्या सहकाऱ्यांना पुढे करत माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे साहेब यांच्यावर घातपाताचा कट रचल्याचे आरोप करत जाहीरपणे शिवीगाळ केली.



त्याचप्रमाणे मा. धनंजय मुंडे साहेब विरुद्ध खोटे पडयंत्र रचताना जाहीरपणे व माध्यमांच्या समोर ऑन एअर धनंजय मुंडे साहेब यांचा नायनाट करू (हत्या करू) तसेच समस्त वंजारी समाजाचा नायनाट करू (हत्या करू) असे बोलून जाहीरपणे जिवे मारण्याची धमकी दिली आहे. मात्र अद्याप मनोज जरांगे या व्यक्तीविरोधात कोणतीही कारवाई पोलीस प्रशासनाने केली नाही.

जाहीरपणे दिलेल्या या धमकी मुळे धनंजय मुंडे यांच्यावर राज्यात फिरत असताना सामूहिक हल्ले घडवून आणण्याचा कट मनोज जरांगे व त्याच्या साथीदारांनी रचला असून, त्यामाध्यमातून सातत्याने धनंजय मुंडे साहेब व वंजारी समाजाच्या

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



## संपादकीय

# दिल्ली हादरली

देशाची राजधानी नवी दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्र. १ जवळ सोमवारी संध्याकाळी एका कारमध्ये जोरदार बॉम्बस्फोट झाला. या स्फोटामुळे दिल्ली हादरली असून स्फोटानंतर लागलेल्या आगीत बाजूच्या तीन कार जळून खाक झाल्या. या स्फोटात १३ जण ठार तर ३० हून अधिक जखमी झाले. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या बॉम्बस्फोटानंतर नवी दिल्लीसहित आर्थिक राजधानी मुंबई तसेच उत्तर प्रदेश आणि देशभरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. या प्रकरणात एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले असून स्फोटामध्ये 'आयईडी'चा वापर करण्यात आला होता अशी माहिती पोलिसांनी दिली.

जम्मू-काश्मीरमध्ये केलेल्या संयुक्त कारवाईतून दहशतवादी हल्ल्याचा मोठा कट उधळल्याचा दावा करण्यात येत असताना सोमवारी सायंकाळी लाल किल्ल्याचा परिसर स्फोटाने हादरला. हा दहशतवादी हल्ला होता की नाही, याबाबत तपास यंत्रणांनी निश्चित तपशील दिला नाही. हा हल्ला नियोजित कट असून दहशतवादी हल्ला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. जखमींची चौकशी करण्यासाठी ते रुग्णालयात पोहोचले. घटना गंभीर असून, या घटनेच्या चौकशीचे आदेश त्यांनी दिले. जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश आणि हरियाणा राज्य पोलिसांनी नुकतीच १५ दिवस संयुक्तपणे कारवाई करून सुमारे २९०० किलो स्फोटके जप्त केली तसेच तीन डॉक्टरांसह आठ जणांना अटक केली. या अटकेमुळे दहशतवादी संघटनांचा मोठा डाव उधळून लावल्याचा दावा पोलिसांनी सोमवारी केला असतानाच नवी दिल्लीत लाल किल्ला परिसर बॉम्बस्फोटाने हादरावा हा योगायोग म्हणावा काय? सोमवारी संध्याकाळी ६.५५च्या सुमारास फोर्ट मेट्रो स्टेशनच्या गेट क्र. १च्या पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या ुदाई आय-२० कारमध्ये स्फोट झाला. या स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की, स्फोट झालेल्या कारचा फक्त सांगाडाच उरला.

स्फोटात ठार झालेल्यांचे मृतदेह छिन्नविछिन्न झाल्याचे दिसून आले. स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १० गाड्या आणि १५ रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या आणि आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. बॉम्ब स्क्वॉड आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी तपास करत आहेत. मात्र, हा स्फोट नेमका कशामुळे झाला याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. लाल किल्ल्याजवळ स्फोट झाल्यानंतर सर्वत्र सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली. दिल्लीतील महाराष्ट्र सदनाचे गेट बंद करण्यात आले तसेच चांदनी चौक मार्केट बंद करण्यात आले. एनएसजी, एनआयएचे पथक यांनीही तपास सुरू केला. जवळपासचे सीसीटीव्ही कॅमेरेही तपासले जात आहेत. दिल्लीतील लाल किल्ला हा संवेदनशील परिसर असून या भागात पर्यटकांची वर्दळ असते. तसेच दिल्लीतील बाजारपेठाही याच भागात आहेत. गत दशकभरात लाल किल्ला परिसरात अनेक लहान-मोठे स्फोट झाले आहेत. गत चार दिवसांत दिल्लीत काही संशयित दहशतवाद्यांना अटक करण्यात आली होती.

त्यामुळे दिल्लीत झालेल्या या स्फोटाकडे दहशतवादी कृत्य म्हणून पाहिले जात आहे. विशेष म्हणजे दिल्लीला लागून असलेल्या फरिदाबाद येथे २९०० किलो अमोनियम नायट्रेटचा साठा सोमवारीच जप्त करण्यात आला होता. याद्वारे 'जैश-ए-मोहम्मद' आणि 'अन्सार गझवात-उल-हिंद' या दहशतवादी संघटनांशी संबंधित 'व्हाईट कॉलर' दहशतवादी मॉड्युलचा पर्दाफाश करण्यात तपास यंत्रणांना यश आले होते. यात काही विद्यार्थी आणि व्यावसायिक दहशतवाद्यांशी संबंधित होते. दहशतवादी हाफिज सईद भारताविरुद्ध नव्या हल्ल्याचा कट रचत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सईद या हल्ल्यासाठी बांगलादेशला लाँच पॅड म्हणून वापरणार असल्याचे वृत्त होते. ३० ऑक्टोबरला पाकिस्तानातील खैरपूर तामेवाली येथील एका रॅलीत हे उघड झाले होते. हाफिज सईद निष्क्रिय बसून नाही. तो बांगलादेश मार्गे भारतावर हल्ला करण्याच्या तयारीत आहे असे वक्तव्य लष्कर-ए तोयबाचा वरिष्ठ कमांडर सैफुल्लाह सैफने केले होते. लष्कर-ए-तोयबाचे दहशतवादी आधीच बांगलादेशात सक्रिय आहेत आणि 'ऑपरेशन सिंदूर'चा बदला घेण्यासाठी सज्ज आहेत असेही तो म्हणाला होता.

# विभागीय हॉकी स्पर्धेत राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिरचे उज्वल यश

## १४ व १९ वर्षाखालील मुलींच्या गटात दुहेरी विजेतेपद - आर के एस व्हि एम सी बी एस ई शाळेचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र





धर्माबाद /अशोक पडोळे

शालेय खेळ लातूर विभाग यांच्या तर्फे आयोजित खालसा हायस्कूल, नांदेड येथे पार पडलेल्या विभागीय शालेय हॉकी स्पर्धेत धर्माबाद येथील राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर (आर.के.एस.व्ही.एम.) शाळेच्या मुलींनी दणदणीत कामगिरी करत १४ वर्षाखालील व १९ वर्षाखालील दोन्ही संघांनी विजेतेपद पटकावले. या दुहेरी विजयामुळे आर.के.एस.व्ही.एम.चे दोन्ही संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले असून शाळेच्या इतिहासात हा एक अभूतपूर्व क्षण ठरला आहे.

१४ वर्षाखालील गटात आर.के.एस. व्ही.एम. संघाने उत्कृष्ट समन्वय दाखवत खालसा हायस्कूल नांदेड प्रतिस्पर्धी संघाचा १-० ने पराभव केला, तर १९ वर्षाखालील गटात खेळाडूंनी जबरदस्त आक्रमक खेळ करून राष्ट्रमाता हायस्कूल नांदेड या प्रतिस्पर्धी संघाचा २-० ने दणदणीत विजय साकार केला. १४ वर्षाखालील गटातील गोल रक्षक आराध्या माने या खेळाडूने पॅनल्टी शूटआऊट मध्ये विजय मिळवला. १९ वर्षाखालील तृषिका सब्बनवार व जान्हवी शेट्टी ह्या खेळाडूंनी एक-एक गोल करून संघास विजय प्राप्त करून दिला.

या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुबोध काकाणी यांनी खेळाडू तसेच हॉकी संघाचे प्रशिक्षक श्री. श्रीनिवास तुळशीराम कांबळे सरांचे मनःपूर्वक अभिनंदन करून शाळेच्या मुलींनी आक्रमक खेळ करून हा विजय प्राप्त केल्याबद्दल त्यांनी मुलांनी केलेल्या पराक्रमाचे कौतुक करून भविष्यात जास्त मेहनत करण्याची सवय अंगी बाळगण्यास यश हमखास मिळेल असा आत्मविश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.तसेच संचालक श्री. सुनील श्रीवास्तव व प्राचार्य श्री. सौरभ सक्सेना उपप्रचार्या स्मिता शर्मा आणि प्राथमिक विभाग प्रमुख सुजीत देशपांडे सह शाळेच्या सर्व शिक्षकांनी खेळाडूंचे कौतुक केले.श्री. सुबोध काकाणी यांनी बोलताना सांगितले की, विद्यार्थिनींची मेहनत आणि जिद्द तसेच प्रशिक्षक श्रीनिवास कांबळे यांचे नियोजनबद्ध प्रशिक्षण यामुळे हे नेत्रदीपक यश मिळाले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंना सर्व सुविधा उपलब्ध करून देत त्यांना प्रोत्साहन दिले जाईल.या दुहेरी विजयामुळे राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर धर्माबादचा लौकिक आणखी वृद्धिंगत झाला



# विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी पचा प्रभावी वापर करा - कार्यकारी मुख्य अधिकारी जितीन रहमान

बीड ।प्रतिनिधी

गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती बीड यांच्या अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांतील शिक्षक व परिवेक्षीय यंत्रणेची तालुकास्तरीय 'विनोबा भावे प' कार्यशाळा आज संस्कार प्राथमिक विद्यालयाच्या सभागृहात उत्साहात पार पडली.कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा परिषद बीडचे कार्यकारी मुख्य अधिकारी श्री. जितीन रहमान उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की,विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आणि अध्यापनाच्या परिणामकारकतेसाठी या पचा जास्तीत जास्त वापर व्हावा. शाळांमधील विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती पवर अपलोड करून पारदर्शक व गतिमान शिक्षणव्यवस्था उभारणे आवश्यक आहे.

त्यांनी पुढे नमूद केले की, 'विनोबा भावे प' च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांचा सराव घेता येईल. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ मिळेल. तसेच पचा प्रभावी वापर करणाऱ्या शिक्षकांचा 'मासिक गौरव पुरस्कार' देऊन सत्कार केला जाईल, असे त्यांनी जाहीर केले.कार्यशाळेत पची सविस्तर माहिती व प्रत्यक्ष प्रात्यक्षिक श्री. विजय वावगे व हितेश भालेराव यांनी दिले. त्यांनी शिक्षकांना पच्या विविध फिचर्स, परीक्षा सराव मॉड्यूल्स, व उपक्रम नोंदणी प्रक्रियेबद्दल माहिती दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी श्री. समदरखान यांनी केले. त्यांनी सांगितले की, बीड तालुक्यातील शिक्षकांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून शिक्षणातील गुणवत्ता वाढविण्यासाठी पुढाकार घ्यावा. विनोबा भावे प'मुळे शिक्षणात डिजिटल क्रांती घडेल .आभार प्रदर्शन केंद्रप्रमुख हकीम मणियार यांनी केले. कार्यक्रमात शिक्षण विस्तार अधिकारी श्री. माटे, सर्व केंद्रप्रमुख, विषय साधन व्यक्ती, केंद्रीय विषय शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमासाठी संस्कार प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. शोभाताई यांनी सभागृह व सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्याबद्दल गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.संपूर्ण कार्यशाळेने शिक्षकांना डिजिटल शिक्षणाच्या नव्या वाटा दाखवून दिल्या असून 'विनोबा भावे प' शिक्षण व्यवस्थेला एक नवीन आधुनिक दिशा देईल

**जाहीर प्रगटन**
**मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अंबड, जि. जालना यांचे न्यायालयात**
**(एस एस परिहार यांचे समक्ष )**
**किरकोळ दिवाणी अर्ज नं. २२५ / २०२५**
**शालन वि निरंक निशाणी क्र. ६**
**अर्जदार :-१. शालन गुलाब बुर्ले, वय ६४ धंदा घरकाम**
**२. हरेश गुलाब बुर्ले, वय ३३ धंदा व्यापार**
**३. अक्षण्य गुलाब बुर्ले, वय ३१ धंदा व्यापार**
**रा. कावंदी गल्ली अंबड, ता. अंबड जि. जालना**
**विरुध्द**
**गैरअर्जदार:निरंक.**
**विषय:- मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांनी विधीज्ञ श्री. के एन शर्मा यांचेमार्फत सदरचा अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदाचे कलम २ व ७ प्रमाणे अर्जदारास वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला असून सदरील अर्जानुसार अर्जदार हे वरील ठिकाणी राहणारा आहे. तसेच मयत गुलाब नेमीनाथ बुर्ले यांची अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहेत व अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच गुलाब नेमीनाथ बुर्ले यांचा दि. ०९/१०/२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर मुळ वारस आहे. अर्जदारांशिवाय अन्य इतर कोणीही वारस नाही. मयत गुलाब नेमीनाथ बुर्ले यांच्या नंतर शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच विज जोडणी, तसेच नळ जोडणी सार्वजनीक बांधकाम उपविभग कार्यालय, तहसील कार्यालय नगर परिषद, ग्रामपंचायत कार्यालय, भुमी अभीलेख कार्यालय अशा सरकारी कार्यालयातील नोंदी हया वारसांने अर्जदाराच्या नावे करणे असल्याने मयत यांचे वारस असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व आम जनतेस कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात स्वतः किंवा वकिलामार्फत आपला आक्षेप असल्यास सदर आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व कोणाचाही काही आक्षेप नाही, म्हणून अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्राचा निकाल देण्यात येईल.

आज दिनांक ११.११.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९१२/२०२५**
**( मार्फत-ॲड. एच. एस. पाटील, गेवराई)**
**रजनी भ्र. वसंतराव शिखरे व इतर वि. निरंक**
**अर्जदार - १. रजनी भ्र. वसंतराव शिखरे, वय ५३ वर्षे, धंदा-नौकरी रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड.**
**२. चंद्रशेखर पि. वसंतराव शिखरे,वय ६१ वर्षे, धंदा सेवानिवृत्त, रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड. ह. मु.छत्रपती संभाजीनगर.**
**३. संजय पि. वसंतराव शिखरे,वय ५८ वर्षे, धंदा-शेती, रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड. ह. मु. पुणे ता. जि. पुणे.**
**४. रेखा भ्र. सतीषराव जाधव, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम रा. यशवंतनगर जालना ता. जि. जालना.**

ज्याअर्थी मयत इंदुमती भ्र. वसंतराव शिखरे व वसंत पि. बापुराव शिखरे, रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड हे / हया अनुक्रमे दिनांक २६/०४/२०२५ व दिनांक ०४/१०/२०२५ रोजी अनुक्रमे रा. छत्रपती संभाजीनगर व रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, ज मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या सदरहू हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत इंदुमती भ्र. वसंतराव शिखरे व वसंत पि. बापुराव शिखरे, रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

पुढील तारीख :- २४/१२/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९०७/२०२५**
**सिता रामेश्वर टेकाळे वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. के. बी. खोसे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे रामेश्वर पि.तुकाराम टेकाळे हे/हया दिनांक.१४/१०/२०२० रोजी उमापुर ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. खालील प्रमाणे अर्जदार नामे-

१. सिता भ्र. रामेश्वर टेकाळे, वयः ३७वर्षे, धंदः घरकाम रा. उमापुर ता. गेवराई जि.बीड

यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत रामेश्वर पि. तुकाराम टेकाळे चे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक. ०४/११/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०८/१२/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

## पान १ वरुन...

**शिरूरचा भुमिपुत्र ...**

देऊन प्रबोधन केले ते सेवानिवृत्ती नंतर आजतागायत सामाजिक ,शैक्षणीक क्षेत्रात मार्गदर्शन करत असुन अर्थशास्त्राचे गणित मांडत असल्याने नुकतीच मराठी अर्थशासत्र परिषदेच्या ४८ व्या अधिवेशनाच्या सर्वसाधारण बैठकीत प्रा .सुभाष दगडे यांची विश्वस्त पदी बिनविरोध तीन वर्षासाठी निवड करण्यात आली .या निवडीबद्दल दगडे यांचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे .

**वडवणी मध्ये धनंजय मुंडे ..**

विरोधात दहशत पसरविण्याचे काम जरांगे यांच्या मार्फत करण्यात येत आहे. श्री. धनंजय मुंडे साहेब हे ज्येष्ठ ओबीसी नेते तथा लोकप्रतिनिधी असून राज्याचे विरोधी पक्षनेते व तीन वेळा कॅबिनेट मंत्री राहिलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब असून, याची शासनाने तात्काळ दखल घेणे गरजेचे आहे. अशी मागणी निवेदनाद्वारे यावेळी करण्यात आली

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच त्यांना जाहीर वक्तव्य करण्यास मनाई करण्यात यावी, अन्यथा सकल ओबीसी समाजाच्या वतीने सबंध वडवणी तालुक्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल व याची सर्वस्वी जवाबदारी शासन व प्रशासनाची राहील असा इशारा देण्यात आला.

वडवणी शहरामध्ये आज दि.१०-११-२०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस समर्थकांनी दुग्धाभिषेक घातला.

मागील काही दिवसापासून माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्यावर मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी केलेले आरोप हे बिनबुडाचे खोटे केले गेले आहेत, इथून पुढे खोटे व बिनबुडाचे आरोप सहन केले जाणार नाहीत असा इशारा ही यावेळी माजी नगरसेवक सतीश बाप्पा बडे, अमोल राजे आंधळे, रमेश मुंडे, विकास आडे, भास्कर मुंडे, गोरख पवार, रामधन नागरगोजे, बळीराम नागरगोजे, किशोर चाटे, वैभव वावधाने, अंकुशराव तुरे, कृष्णा लांब, बापूराव सरवदे, विराज राठोड,विकी राठोड, रंजीत वडणे, राजाभाऊ जाधव, कृष्णा शिंदे, सुमंत आंधळे, शुभम जायभाये, फुलचंद मुंडे, अमोल नागरगोजे,व इतर उपस्थित ओबीसी समाज आणि समर्थकांनी दिला आहे.

**आ. संदीप क्षीरसागर ...**

दरम्यान मुंबईतील मुक्तागिरी निवासस्थानी महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक अत्यंत विश्वासू व खंदे समर्थक म्हणून सर्वश्रुत असणारे सतीष जगन्नाथ शेळके, कैलास रमेश घल्लाळ (सरपंच), अजिज चाँद शेख (उपसरपंच), प्रफुल्ल हनुमंतराव पाठक,किरण शिवाजीराव शिंदे, रोहित श्रीराम जाधव, सुरेश शिवाजीराव खुरणे (उपसरपंच), गणेश आनंदराव भरनाळे,महेश भगवान कदम, संदीप फल्हाद नवले यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा लक्षवेधी प्रवेश सोहळा पार पडला. या महत्वपूर्ण प्रवेश सोहळ्याने बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट हादरला असून आगामी निवडणुकांत राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली आहेत व शिवसेनाची पकड आणखी मजबूत झाली आहे. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्यासह जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर उपस्थित होते.

**गेवराई शहरातून ...**

आहेत. महेश दाभाडे यांच्या चांगल्या कामाचा व दांडगा जनसंपर्क हा शितलताई यांच्या कामी येत असून त्यांना वार्डा वॉर्डातून प्रचारादरम्यान चांगला प्रतिसाद मिळत असून गेवराईकर म्हणतात माझी लेक,बहीण उभी आहे यावर्षीची भाऊबीज म्हणून शितलताईला मतदान रुपी आशीर्वाद द्यायचे.

## पान १ वरुन...

गेवराई नगरपरिषदचे मतदान हे २ डिसेंबर रोजी होणार असून या निवडणुकीत सौ. शितलताई महेश दाभाडे व सौ.गीताभाभी बाळराजे पवार यांची सरळ लढत होणार असून दोन्हीही उमेदवार गेवराई शहरातील प्रत्येक प्रभागात जाऊन प्रचार करताना व मतदारांच्या गाठीभेटी घेताना दिसून येत आहेत. शितलताई ह्या मूळच्या गेवराईतील असल्याने त्यांचं माहेर व सासर हे गेवराईच आहे. त्यामुळे गेवराईकरांतून त्यांना प्रचारादरम्यान चांगला प्रतिसाद मिळत आहे. तसेच त्यांचे पती महेश दाभाडे हे सर्व सामान्य घरातील असून प्रस्थापितांना टक्कर देण्यासाठी सज्ज असून गेवराई शहरात त्यांचा दांडगा जनसंपर्क व मित्रपरिवार आहे. शहरातील प्रत्येक वार्डा वार्डात त्यांचे कार्यकर्ते व त्यांचा चाहता वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे सर्व समाज बांधवांना धरून चालतात व त्यांच्या अडीअडचणीत सदैव तत्पर्य राहतात त्यामुळे त्यांना मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर असून याचा फायदा त्यांच्या पत्नी सौ. शितलताई महेश दाभाडे यांना प्रचारादरम्यान होताना दिसून येत असून ते ज्या ज्या वार्डात प्रचाराला जातात त्या वार्डातील नागरिक म्हणतात आमची लेक, बहीण, आली आहे यावेळेसची भाऊबीजचा तिला मतदान रुपी आशीर्वाद द्यायची आहे.

**सर्वसामान्य लोकांची ...**

आखण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.११) रोजी राष्ट्रवादी भवन बीड, येथे आपले पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची बैठक घेतली. या बैठकीत सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवार यांनी आपापली मते मांडली. दरम्यान हि बैठक केवळ चर्चा करण्यासाठी असतानाही, या बैठकीला अक्षरशः सभेचे स्वरूप आले. या बैठकीत गर्दीने उच्चांक गाठल्याचे दिसून आले. जनतेच्या आशा-अपेक्षांचा वेध घेत, विकास आणि पारदर्शकतेचा नवा अध्याय लिहिण्याची तयारी सर्वांना सोबत घेऊन केली आहे असे आ.क्षीरसागर यांनी सांगितले. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**धोंडेसाहेब तुमच्या महेश ...**

जाईल. शेतकऱ्यांनी आता कृत्रीम बुध्दीमत्ता वापरुन शेती करावी. नवनवीन टेक्नलाजीने जग जवळ आलेले आहे. धोंडेसाहेब तुमच्या साखर कारखान्याचे परवान्यासाठी अमित शहा यांच्याकडे जाऊ असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँगेसचे (अजित पवार) राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजितदादा पवार यांनी दिले.

मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जवळील सभागृहात आयोजित पक्षप्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आ. विजयसिह पंडीत, आ. शिवाजीराव गर्जे, माजी आ. बाळासाहेब आजबे, जिल्हाध्यक्ष राजेश्वर देशमुख, सुरजभैय्या चव्हाण, कल्याण आखाडे, आक्रुरशेठ कुदळे, संध्याताई सोनवणे, डा.अजयदादा धोंडे, अभय धोंडे, संतोष जाधव, हनुमंत थोरवे, दिलीप फरांदे, संतोषभैय्या चव्हाण, रुपेश बेदरे, भाऊसाहेब लटपटे, शिवाजी नाकाडे, विश्वास नागरगोजे, दशरथदादा वनवे, बाळासाहेब पवार, दिलीप म्हस्के फौजी, नियामत बेग, पांडुरंग नागरगोजे, सुरेश माळी, सतिषमामा झगडे, इंदुबाई गोल्हार, सावता ससाणे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी आ. भीमराव धोंडे बोलताना म्हणाले की, अजितदादा पवार हे माझे परिचयाचे नेतृत्व आहे. मागे काँग्रेसमध्ये आम्ही एकत्रित काम केलेले आहे. मी आमदार असताना अजितदादा मंत्री होते. अजितदादा हे धडाडीचे व करारी नेतृत्व आहे. त्यांच्या कामाचा मला अनुभव आहे. आष्टी विधानसभा मतदार संघात सध्या लोकप्रतिनिधींची धाकदडपशाही, दादागिरी सुरु आहे. अजितदादा तुमच्या सहकार्याने त्यांची ही दादागिरी दडपशाही लोकशाही मार्गातुन संपयची आहे. घड्याळ चिन्हावर आम्ही निवडणुक लढवुन स्थानिक स्वराज्य संस्था जिंकुन दाखवु असे आश्वासन दिले.

## पान १ वरुन...

आष्टी, पाटोदा, शिरूर का. विधानसभा मतदार संघाचा यापुढेही खऱ्या अर्थाने व्यापक स्वरूपात विकास घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातून मतदार संघातील जनसामान्यांच्या भावना लक्षात घेऊन आणि शेतकरी शेतमजूर आणि सर्व घटकांच्या इच्छेखातर आपण दीर्घकालीन शाश्वत विकास खेचून आणण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार) पक्षात आपण प्रवेश घेत असल्याची स्पष्टोक्ती केली. माजी आ. भीमराव धोंडे हे मंगळवारी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजितदादांच्या पक्षात मतदार संघातील हजारो कार्यकर्त्यांसह प्रवेश घेतला. यावेळी बोलताना माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, मी एक सामान्य जनतेच्या हितासाठी झटणारा कार्यकर्ता आहे. भाजपमध्ये असतानाही प्रमाणिकपणे जनहितासाठी कार्य केले. त्या पक्षातुन मला निलंबीत केल्यानंतर मी यापुढे विधानसभा मतदार संघातील दीर्घकालीन शाश्वत विकास योजना आणून मतदार संघाचा विकास घडावा या व्यापक हेतूने हा पक्ष प्रवेश करत आहे. मराठवाड्यातील विशेष असे कॅन्सर हॉस्पिटल तसेच शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असलेला महेश (कडा) सहकारी साखर कारखान्यासाठी पुन्हा गतवैभव निर्माण करून देण्याच्या हेतूनेसुद्धा शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल असा विश्वासही माजी आ. भीमराव धोंडे यांनी यावेळी व्यक्त केला. भविष्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतरही छोट्या - मोठ्या निवडणुकीमध्ये उत्स्फूर्त सहभाग दाखवून पक्ष आणि कार्यकर्त्यांसाठी यश मिळवून देणार असाही ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी माजी आ. बाळासाहेब आजबे म्हणाले की, प्रत्येकाला अडचण आणणारा आमदार आष्टीत करुन ठेवला आहे. गोरगरीबाला आष्टीच्या विद्दमान आमदाराचा त्रास होत आहे. महेश सह. साखर कारखाना सुरुच झाला पाहिजे. आपले राष्ट्रवादीचे रनींग आमदारांनी अजितदादा पवार यांना याबद्दल सांगा असे सांगत आष्टी मतदार संघाची मोट बांधुन धोंडेसाहेब व मी जि. प. व पं. स. निवडणुक जिंकु असे माजी आ. बाळासाहेब आजबे आपल्या भाषणात सांगितले. यावेळी बीडचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर देशमुख, काकासाहेब शिंदे (आष्टी तालुकाध्यक्ष), दिपक घुमरे (पाटोदा तालुकाध्यक्ष), दशरथदादा वनवे यांचे समयोजीत भाषणे झाले.

**पहिल्या पत्नीने जाब...**

कपाळावर धारदार वस्तऱ्याने वार करून इतर तिघां सोबत संगनमत करून पहिल्या पत्नीला बेदम मारहाण केल्या प्रकरणी पहिल्या पत्नीच्या फिर्यादीवरून पती विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे.केज येथील क्रांतीनगर भागात राहणारे सतीश लांडगे आणि त्यांची पत्नी अंजना लांडगे यांच्यात चार महिन्यांपूर्वी झालेल्या किरकोळ भांडणामुळे अंजना लांडगे या क्रांतीनगर येथील मुलाच्या घरी राहत होत्या.याच दरम्यान, सतीश लांडगे यांनी दुसऱ्या महिलेशी लग्न करून तिच्यासोबत राजरोस राहण्यास सुरुवात केली.नवऱ्याच्या दुसऱ्या लग्नाची माहिती मिळताच अंजना लांडगे यांनी याबाबत आपल्या पतीकडे विचारणा केली, व सामान आणि घर बांधण्यासाठी दिलेले २ लाख रुपये परत मागितले असता, सतीश लांडगे यांनी त्यांना घराबाहेर हाकलून दिले.

अंजना लांडगे यांचा मुलगा आणि सून दि.७ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे आठ वाजता ऊस तोडणीसाठी साखर कारखान्यावर गेले असताना,अंजना लांडगे या घरी एकट्या असल्याच्या संधीचा फायदा घेऊन,पती सतीश लांडगे याच्यासह अलका रोहीदास मुजमुले,किरण रोहीदास मुजमुले आणि कुणाल रोहीदास मुजमुले हे चौघेजण त्यांच्या घरात घुसले.व त्यांनी अंजना लांडगे यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली.पती सतीश लांडगे यानी क्रूरतेची परिसीमा गाठत अंजना लांडगे यांच्या कपाळावर धारदार वस्तऱ्याने वार करून त्यांना गंभीर जखमी केले.

या घटनेनंतर अंजना लांडगे यांच्या फिर्यादी वरून पती सतीश लांडगे, अलका मुजमुले,किरण मुजमुले आणि कुणाल मुजमुले या चौघांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार त्रिंबक सोपने हे पुढील तपास करीत आहेत.



## बाळाला विष पाजुन आईने घेतला गळफास

प्रतिनिधी @ बार्शी

बार्शी तालुक्यात घडलेल्या धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. वाणी प्लॉट परिसरात २५ वर्षीय विवाहितेने आपल्या चिमुकल्या १४ महिन्यांच्या बाळाला आधी विष पाजले. त्यानंतर स्वत: घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. मुलाचा जीव वाचवण्यात डॉक्टरांना यश मिळाले असून त्याची प्रकृती सध्या गंभीर आहे.

# वांजरा फाटा – कुसळंब रस्त्याच्या बोगस कामामुळे अपघातात पहिला बळी!



### गुत्तेदार बोगस, रस्त्याचे काम देखील बोगस सर्वसामान्य नागरिकांचे चालले बळी!

प्रतिनिधी । पाटोदा

वांजरा फाटा – कुसळंब हा रस्ता वर्षापूर्वीच तयार करण्यात आला होता. या रस्त्यावर पहिल्या तीनच महिन्यात खड्डे आणि अर्धा रस्ता कामातून गेला होता. त्यात पुन्हा खड्डे बुजवले पुन्हा महिन्यात खड्डे पडले. एकूणच हा रस्ता निव्वळ बोगस झाला आहे.

वांजरा फाटा – कुसळंब रस्ता सुरू होतानाच तिथे बोगसपणा दिसल्याने अनेकदा वर्तमानपत्राच्या माध्यमातून या रस्त्याच्या बातमी, तक्रारी करूनही काही फरक पडला नाही. गुत्तेदाराच्या त्या बोगस कामामुळे आज अपघात होऊन निलावती नरोडे या महिलेचा मृत्यू झाला. जयदत्र रामचंद्र नरवडे व निलावती नरोडे रा.तरडगाव ता. करमाळा जिल्हा सोलापूर हे गहिनीनाथ गडाच्या दर्शनासाठी आले होते. रस्त्यात खड्डे असल्याने त्या खड्ड्यात गाडी आढळली आणि गाडीवरून खाली पडल्या. डोक्याला मार लागला. हॉस्पिटलमध्ये नेलं परंतु त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. वांजरा फाटा – कुसळंब रस्त्याच्या या बोगस कामामुळे पहिला बळी गेला आहे. अधिकारी याकडे कशादृष्टीने पाहतात हे पहाव लागेल. या मृत्यूला जबाबदार कोण ? या बोगस कामावर वचक नाही का ? आता हा रस्ता पुन्हा एकदा त्याच गुत्तेदाराकडून करून घ्यावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे..

### वांजरा फाटा – कुसळंब रस्त्याच्या गुत्तेदाराकडून पुन्हा काम करून घ्या!

वांजरा फाटा – कुसळंब रस्त्याच्या कामासंदर्भात वारंवार पत्रकारांनी देखील वर्तमानपत्रांच्या माध्यमातून बातम्या देऊन हा रस्ता भोगत होत आहे हे दाखवून दिले होते परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी कसली दखल न घेता गुत्तेदारांनी ही थातूरमातूर काम करून मोकळे झाले आता नागरिकांचे बळी चालले आहे त्याला जबाबदार कोण हा रस्ता त्याच गुत्तेदाराकडून पुन्हा करून घ्यावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी दिला आहे.



गेवराई – जि. प. मा. शा. उमापूर येथील सहशिक्षिका शोभा दळवी या आपल्या आदर्श लाडक्या शिक्षिकेचा चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अनोखा पद्धतीने वाढदिवस करत शिक्षकांप्रती असलेला आदर या आदर्श उपक्रमातून सिद्ध केला. बालचिमुकल्यांचे वाढदिवसानिमित्त उत्स्फूर्तपणे केलेली नियोजन आणि त्यांचे निस्सीम प्रेम पाहून या आदर्श शिक्षिकेच्या डोळ्यात आनंदाचे अश्रू उभारले.

# रूपाली पाटील ठोंबरे, अमोल मिटकरींची राष्ट्रवादीच्या प्रवक्तेपदावरुन हकालपट्टी !

## पक्ष शिस्तीसाठी अजित पवारांचा मोठा निर्णय!

मुंबई /वृत्तसंस्था

**राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) पक्षात शिस्त आणि आंतरिक समन्वय राखण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या दोन प्रमुख प्रवक्त्यांना, रुपाली पाटील ठोंबरे आणि अमोल मिटकरी यांना त्यांच्या पदावरून मुक्त करण्यात आलं आहे. पक्षाने नव्या १७ प्रवक्त्यांची यादी जाहीर केली असून, त्यात या दोघांची नावे नाहीत.**

रुपाली पाटील ठोंबरे यांना हटवण्यामागचं मुख्य कारण म्हणजे त्यांनी पक्षाच्या महिला नेत्या आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर सातत्याने केलेली टीका.फलटण येथील महिला डॉक्टरच्या आत्महत्येच्या प्रकरणात ठोंबरे यांनी महिला आयोगावर दुर्लक्ष केल्याचा आरोप केला होता. त्यावरून त्यांनी चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली आणि पुण्यात आंदोलनही केलं होतं. या भूमिकेला पक्षाने शिस्तभंग मानून ठोंबरे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र, नोटिशीनंतरही त्यांनी आपली आक्रमक भूमिका कायम ठेवली, ज्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार नाराज झाल्याचं सांगितलं जातं. शेवटी पक्षाने त्यांच्यावर कारवाई करत त्यांना प्रवक्तेपदावरून हटवलं. प्रवक्तेपदावरून हटवण्यात आलेले दुसरे नाव म्हणजे अमोल मिटकरी, जे पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषद सदस्य आहेत. त्यांच्याबाबत अधिकृत कारण स्पष्ट झालेलं नसले तरी, गेल्या काही दिवसांतील त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे पक्षाची प्रतिमा धोक्यात आली असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.




### अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे अधिकृत प्रवक्ते...

अनिल पाटील, रुपाली चाकणकर, ब्रिजमोहन श्रीवास्तव, चेतन तुपे, आनंद परांजपे, अविनाश आदिक, सना मलिक, राजलक्ष्मी भोसले, सुरज चव्हाण, हेमलता पाटील, प्रतिभा शिंदे, विकास पासलकर, राजीव साबळे, प्रशांत पवार, श्याम सनेर, सायली दळवी आणि शशिकांत तरंगे. अशा १७ प्रवृत्तींची यादी जाहीर करण्यात आली आहे.

त्यामुळेच नव्या यादीत मिटकरी यांना स्थान देण्यात आलं नाही. अजित पवार गटाने जाहीर केलेल्या नव्या प्रवक्त्यांच्या यादीत हेमलता पाटील, प्रतिभा शिंदे यांच्यासह आणखी १५ नवी नावे समाविष्ट करण्यात आली आहेत. या नव्या नियुक्त्यांमधून पक्षाने शिस्त, संघटनशक्ती आणि माध्यमांवरील वक्तव्यांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्याचं दिसत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) पक्षात शिस्त आणि आंतरिक समन्वय राखण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या दोन प्रमुख प्रवक्त्यांना, रुपाली पाटील ठोंबरे आणि अमोल मिटकरी यांना त्यांच्या पदावरून मुक्त करण्यात आलं

# शिरूरकर राष्ट्रसंत परमहंस तुकडोजी महाराज यांचे गुरूस्थळी ! गुरू शिष्या सह गजानन महाराज यांचेही दर्शन !

विदर्भवासियांकडून शिरूरकरांचा सन्मान !

शिरूर कासार/प्रशांत बाफना : ग्रामगीता या ग्रंथरचनेद्वारे सकल समाजाला सोप्या भाषेतून उपदेश करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे गुरू तथा कासार समाजातील एक सिध्दपुरूष संत परमहंस श्री समर्थ आडकोजी महाराज यांचा २०४ वा जन्मोत्सव तर १०४ वी पुण्यतिथी निमित्ताने प्रथमच शिरूरकर दर्शनासाठी गेले असता विदर्भ संस्थानकडून संत प्रतिमा भेट देऊन सत्कार केला ,तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधी महास्थळाचे आणि अवलिया संत शेगावीचे गजानन महाराज यांचेही दर्शन घेतले .कासार कुळात अमरावती जिल्ह्यात आर्वी या गांवी जन्मावतार घेतलेले संत आडकोजी महाराज यांची जन्मतिथी व पुण्यतिथी त्या बरोबर आयुष्य मर्यादाची शंभरी असा योग साधलेले एक सत्पुरूष असुन विदर्भात मोठा भक्तवर्ग असुन राष्ट्रसंत ग्रामगीताकार संत तुकडोजी महाराज यांचे गुरू असुन सकल मानवजातीला सोप्या ग्राम्य भाषेतून आत्मकल्याणा बरोबर देशप्रेमाची ज्योत तेवत ठेवली ,आजही या संतद्वयाच्या समाधीस्थळावर आपला माथा ठेकण्यासाठी हजारो भाविक या क्षेत्रावर येत आहे .

संत हे जात पंथ भेदाभेद या पलिकडचे असतात तरी देखील ज्या कुळात ज्या जातीत त्यांनी जन्मावतार घेतला ही स्वाभिमानाची बाब मानली जाते ,वेगवेगळ्या जातीत जन्म



घेतले तरी या सकलसंत मांदियाळीने समाज पारमार्थिक बाबतीत एकत्रित बांधण्याचे काम केले ,त्याच न्यायाने कासार कुळात संत आडकोजी महाराज यांनी अवतार कार्य केले त्या महापुरूषाचे ऋण व्यक्त करण्यासाठी व आपला आत्मोध्दार व्हावा यासाठी जन्मोत्सव तथा पुण्यस्मरण केले जाते .

समाधी पुजन ,जेष्ठ नागरिकांचा सन्मान ,गुणवंताणा ,

गुणगौरव आणि पुरस्कार सन्मान सोहळा आयोजीत करून विदर्भ वासियांनी समाजबांधवासह भक्तगणांचे लक्ष वेधून घेतले ,उत्तर महाराष्ट्राने महाप्रसाची जबाबदारी सांभाळली होती .शिरूर कासार येथून नगरपंचायतचे प्रथम नगराध्यक्ष तथा कालिका देवी संस्थानचे अध्यक्ष रोहीदास पाटील ,विद्यमान नगराध्यक्षा प्रतिभा पाटील ,माजी नगराध्यक्षा मिरा गाडेकर ,माजी नगरसेविका अश्विनी भांडेकर ,नगरसेविका सुभाष गाडेकर यांचेसह कालिका देवी संस्थानचे सचिव बापुराव गाडेकर ,राजेंद्र गाडेकर ,प्रमोद दगडे ,प्रदीप दगडे , यंडे ,लक्ष्मण थोरात ,धनंजय झिंजुर्डे आदिनी दर्शन घेतले तर संतभुमिकडून त्यांचा आडकोजी महाराज यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार केला . प्रमुख उपस्थिती !

महंत श्रीकांत धुमाळ ,निशिकांत धुमाळ ,गोविंद अंधारे, यांचेसह सागर महाराज , कृष्णा सरवदे , विविध संस्थानचे अध्यक्ष व कासार समाज बंधू भगिनी मोठ्या संखेने उपस्थित होत्या

# महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसला सन्मान जनक जागा मिळाव्यात: मंत्री नरहरी झिरवाळ

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार तयारी केली आहे. ही निवडणूक महायुतीत लढायची की स्वबळावर याबाबत अद्याप निर्णय झाला नसला तरी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तयारी सुरू केली आहे. महायुती झाल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसला सन्मान जनक जागा मिळाव्यात अशीच अपेक्षा आमची आहे. ज्या ठिकाणी आमची ताकद आहे त्या ठिकाणी आम्हाला जागा मिळावी अशी मागणी केली आहे.

मुस्लिम नागरिक भाजपला मतदान करत नाही म्हणून त्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसला जागा दिली जाते, असे चालणार नाही. तर सन्मान जनक जागा मिळाव्यात. अद्याप महायुतीचा निर्णय झाला नसल्याने कार्यकर्त्यांनी संयम ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर निष्ठा ठेवून काम करावे. पक्षाला जे सोडून गेले ते पुन्हा निवडून येत नसतात. स्वार्थापोटी जे बाहेर गेले त्यांची फजिती झालेली आपण पाहिली आहे. म्हणून उमेदवारी कोणालाही मिळो कार्यकर्त्यांनी पक्षाचे निष्ठा ठेवूनच काम करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संपर्कमंत्री तथा राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले. मंत्री नाहारी झिरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी सकाळी नगरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट)च्या उमेदवारनिहीय मुलाखतींसाठी आढावा बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी मंत्री झिरवाळ यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी आ.संग्राम जगताप, आ.काशिनाथ दाते, जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत , माजी आमदार चंद्रशेखर घुले, अरुण तनपुरे, पणन महासंघाचे अध्यक्ष दत्ता पानसरे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, महिला जिल्हाध्यक्ष अशा निंबाळकर, युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे, ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार, तर जिल्हा कार्यालय मंत्री साईनाथ भगत जिल्हा सचिव सचिन डेरे आदिसह सर्व तालुकाध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, राज्यांमध्ये असलेले अस्थिरतेचे वातावरण महायुतीची सत्ता आल्याने दूर झाले आहे. महायुतीच्या माध्यमातून राज्यात चांगले काम होत आहे. आता येणाऱ्या सर्व निवडणुकांना ताकतीने सामोरे जायचे आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पूर्ण आढावा घेऊन स्थानिक पातळीवर चर्चा केली आहे. नगर शहर व दक्षिण भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी चांगले वातावरण आहे. त्यामुळे महानगरपालिका, नगरपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत




समिती निवडणूक साठी सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी जय्यत तयारी केली आहे. पक्षाच्या वरिष्ठांनी स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद पाहून निर्णय घ्यावा. तिकीट देताना जास्तीत जास्त पक्षाच्या उमेदवारांचा विचार व्हावा तसेच वस्तुस्थिती पहावी. उपमुख्यमंत्री अजित दादांना पूरक असेच निर्णय घ्यावेत. ज्या ठिकाणी माझी मदत लागेल त्यासाठी मी सदैव उपलब्ध आहे. येणाऱ्या सर्व निवडणुका जिंकण्याच्या दृष्टीनेच पक्षाने तयारी करावी.

प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष अशोक सावंत म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यातील दक्षिण भागातील तालुक्या निहाय नगरपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या इच्छुकांच्या मुलाखती सुरू झाल्या आहेत. या मुलाखतींचा अहवाल तयार करून तो वरिष्ठांकडे सुपूर्द करण्यात येणार आहे. या निवडणुकांसाठी पक्षाने १३ प्रमुख जणांची कृती समिती केली असून या कृती समितीचे नेतृत्व आमदार संग्राम जगताप करणार आहे. त्याचबरोबर आमदार काशिनाथ दाते, आमदार शिवाजीराव गर्जे यांच्यासह सर्व प्रमुख पदाधिकारी या समितीत आहेत. आढावा बैठकीचे सूत्रसंचालन जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे यांनी केले तर जिल्हा कार्यालय मंत्री साईनाथ भगत यांनी आभार मानले.

# औषध कंपन्यांना ३१ डिसेंबरपर्यंत अल्टिमेटम



नवी दिल्ली : वृत्तसंस्था

विषारी कफ सिरपमुळे अलीकडेच मोठ्या प्रमाणात बालकांचे मृत्यू झाले होते. या प्रकारानंतर देशातील औषध उत्पादक कंपन्यांना जागतिक उत्पादन मानके पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कंपन्यांनी ही प्रक्रिया जानेवारीपर्यंत पूर्ण करावी. त्यापुढे त्यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही, असे भारताच्या औषध नियामकांनी स्पष्ट केले आहे.

विषारी कफ सिरपमुळे सप्टेंबरमध्ये २४ बालके दगावली. यामुळे हादरून गेलेल्या यंत्रणांनी सर्व उत्पादक कंपन्यांची झाडाझडती घेतली. काही कंपन्यांच्या संचालकांवर कारवाई करण्यात आली.

ज्या कंपन्या मुदतवाढ निकषांतर्गत येत नाहीत त्यांची त्वरित तपासणी करावी, असे सूचनेत म्हटले आहे. या निकषांची अंमलबजावणी होते की नाही ते तपासण्याची जबाबदारी राज्य अधिका-यांकडे सोपविण्यात आली आहे. सेंट्रल ड्रग्ज स्टॅन्डर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशनने म्हटले आहे की शेड्यूल एम अंतर्गत सुधारित मानके १ जानेवारीपासून सर्व उत्पादकांना लागू होतील. राज्य नियामकांना तपासणी सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

# शिवसेनेचा निर्धार - गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत सक्षम उमेदवार देऊ आणि निवडून आणू - शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे गट पक्ष निर्धाराने निवडणुक लढविणार असून, गेवराई शहरातील नागरीकांसमोर नगराध्यक्ष पदासाठी एक सक्षम पर्याय आम्ही देणार आहोत. नगराध्यक्षपदा साठी अनेक कर्तृत्ववान महिला पक्षामध्ये आहेत. त्यापैकी, पक्षाच्या वरीष्ठ पातळीवर लवकरच निर्णय होईल आणि एक चांगला उमेदवार आम्ही जनतेसमोर ऊभा करू, असा ठाम विश्वास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत अप्पा नवले यांनी येथे व्यक्त केला आहे.

दरम्यान, शिवसेनेचे तालुकाप्रमुख उद्धव मडके, शहर प्रमुख महाजन यांनीही नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करून, समविचारी पक्षाला सोबत घेऊन चांगला उमेदवार देऊ, गेवराई शहराच्या विकासात शिवसेना इमानदारी भूमिका पार पाडणार असल्याचा निर्धार करून शहरातील मतदार शिवसेनेचे प्रमुख नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे गेवराई नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत आम्हाला यश मिळवून देतील असा विश्वास व्यक्त केला आहे.आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने उमेदवार निवडीची प्रक्रिया मंगळवार ता. ११ रोजी पार पडली आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ११. ११. २०२५ रोजी मोंढा नाका गेवराई येथे शहर प्रमुख मुकेश महाजन यांच्या संपर्क कार्यालयामध्ये घेण्यात आल्या. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले, तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके, शहरप्रमुख मुकेश महाजन व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाप्रमुख ड. नवले अप्पा म्हणाले की, प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम, लोकाभिमुख, विकासाभिमुख आण समाज कार्यासाठी



जास्तीत जास्त वेळ देणारा चेहरा पुढे आणण्यावर आमचा भर राहणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्याचे ड. चंद्रकांत नवले यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की,

नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणारी महत्त्वपूर्ण संस्था आहे. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वाहतूक, बाजारव्यवस्था व नागरिकांचे कल्याण, यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यावश्यक असल्याचेही जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले यांनी सांगितले. शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मडके यांनी गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना शहाराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून लढणार असल्याचे सांगितले. जुन्या शहराचा विकास हाच आमचा ध्यास असून, प्रस्थापित नेत्यांच्या विरोधात ठाम पणे, मोठ्या निर्धाराने गेवराई नगर परिषदेची निवडणूक लढविणार असल्याचा विश्वास शहर प्रमुख मुकेश महाजन यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी उपजिल्हाप्रमुख ड. नारायण शिंदे, ओबीसी सेलचे तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, ओबीसी सेलचे तालुका संपर्कप्रमुख नागराज तलवाडे, युवा सेना तालुकाप्रमुख बिभीषण मोघे, शेतकरी सेना जिल्हाप्रमुख संदीप सोनवणे, शिवसेना नेते राजेंद्र डाके पाटील, गणेश पवार, विक्रम भोसले, दत्तू नाना येवले, शिवराज उगले, अभय भांडवलकर, नागेश मिटे,अंकुश गिरी संजय नवले, उमेश शिंदे आदी उपस्थित होते.



# निमसाखर परिसरात थंडीचा जोर वाढला

निमसाखर (गणेशराव धनवडे)

गेल्या काही दिवसांपासून तापमानात झालेल्या घटेमुळे निमसाखर परिसरात थंडीचा जोर वाढला आहे. पहाटे आणि रात्रीच्या वेळी गार वारे वाहत असून वातावरणात गारवा पसरला आहे. त्यामुळे नागरिकांनी उबदार कपडे, स्वेटर, मफलर आणि ब्लँकेट्सचा वापर सुरू केला आहे.हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील दोन दिवस तापमान आणखी खाली जाण्याची शक्यता असून सकाळच्या वेळेत दवबिंदू पडत आहेत. शेतात काम करणारे शेतकरी व सकाळी शाळेला जाणारी मुले थंडीमुळे त्रस्त झालेली दिसत आहेत.थंडी वाढल्याने चहा आणि गरम पदार्थांच्या दुकानांवर गर्दी वाढली आहे. आरोग्य तज्ज्ञांनी सर्दी, खोकला आणि ताप यासारख्या आजारांपासून बचावासाठी योग्य काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः लहान मुले आणि वृद्धांनी थंडीपासून बचावासाठी उबदार कपड्यांचा वापर करावा,



# इंदिरा गांधी कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी नंदिनी कांदे भालाफेक स्पर्धेत विभागात तिसरी आल्याबाबत सत्कार

दिंद्रुड ।प्रतिनिधी

विभागीय मैदानी स्पर्धेत दिंद्रुड येथील इंदिरा गांधी कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी नंदिनी कांदे हिचा तिसरा क्रमांक आल्या बाबत शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. परभणी जिल्ह्यातील मानवत येथे शनिवार (दि.८ रोजी) विभागीय मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. भालाफेक या स्पर्धेत इंदिरा गांधी कन्या शाळेच्या नंदिनी वचिष्ट कांदेचा १७ वर्ष वयोगटात तिसरा क्रमांक आला. त्याबाबत शाळेचे मुख्याध्यापक एम.एस. काळे,सहशिक्षक रामराव लांडगे, क्रिडाशिक्षक श्रीनिवास झाटे सह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी नंदिनी व पालक वचिष्ट कांदे यांचा सहृदय सत्कार करत अभिनंदन केले आहे.

# ऊसतोड हंगामात बिबट्याचा धसका

जालना /प्रतिनिधी

जिल्ह्यात ऊसतोडीचा हंगाम जोमात सुरू असताना अंबड तालुक्यातील सुखापुरी मंडळात बिबट्याचा वावर असल्याचे वन विभागाच्या रेस्क्यू टीमने पुष्टी केली आहे. त्यामुळे शेतकरी व ऊसतोड मजुरांनी शेतीकाम करताना अत्यंत सावधानता बाळगावी, असे स्पष्ट आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.मंगळवार,दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मौजे पिठोरी सिरसगाव शिवारात शेतकऱ्यांना बिबट दिसल्याची माहिती मिळाल्यानंतर वन विभागाच्या रेस्क्यू टीमने घटनास्थळी जाऊन पाहणी केली. या पाहणीत बिबट साधारण १० किमीच्या परिघात वावरत असल्याचे स्पष्ट झाले. या परिसरात ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणात असल्याने सध्या ऊसतोडणीदरम्यान बिबट शेतकऱ्यांना दिसून येत आहे.

सुखापुरी मंडळात सुखापुरी, वडीकाळ्या,एकनाथ नगर, वडीगोद्री, पिठोरी




## शेतकरी आणि ऊसतोड मजुरांनी घ्यावी विशेष काळजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आवाहन

सिरसगाव आणि कारंजळा या गावांचा समावेश असून या गावांमध्ये वन्यजीव बचाव टीमकडून जनजागृती मोहिम राबवली जात आहे.जिल्हाधिकारी मित्तल यांनी सांगितले की ऊसतोडणी किंवा शेतीची कामे शक्यतो गटाने करावीत एकट्याने शेतात जाणे टाळावे. आपल्या लहान मुलांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. बिबट दिसल्यास गर्दी, दगडफेक किंवा मोबाईलवर व्हिडिओ काढण्याचा प्रयत्न करू नये.बिबट अथवा त्याची पिल्ले आढळल्यास तत्काळ खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा वनपरीक्षेत्र अधिकारी विजय दौंड ८२६२०७८८८६,वनपरिमंडळ अधिकारी बी.एम.पाटील ९७३०४१४२८७,वनरक्षक कैलास कदम ९७३०१३१४९८

किंवा वन विभागाच्या १९२६ हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.वन्यजीव बचाव टीमच्या माहितीनुसार,उंदीर,पक्षी,डुकरे, कुत्रे आणि सरपटणारे प्राणी हे बिबट्याचे प्रमुख खाद्य आहे. त्यामुळे या भागात बिबट्याचा वावर कायम राहण्याची शक्यता आहे.वन विभागाने ग्रामस्थांना सूचना दिल्या आहेत की

पहाटे व संध्याकाळी शेतात जाणे टाळावे,पाळीव प्राण्यांना सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवावे,

बिबट जवळ आल्यास शांत राहावे आणि त्याला मार्गाने जाऊ द्यावे,डिवचण्याचा किंवा आवाज करण्याचा प्रयत्न अजिबात करू नये.सहायक वनसंरक्षक सुदाम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विजय दौंड,बी.एम.पाटील, कैलास कदम,श्री.शिंगणे,श्री. मिटके,श्रीमती जाधव आणि श्रीमती फड या अधिकाऱ्यांनी गावागावांत जाऊन जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. ग्रामस्थांमध्ये भीती न ठेवता सावधगिरी आणि सहकार्याचे महत्त्व पटवून दिले जात आहे.

# अमृत दुर्गोत्सवाचा जागतिक विश्वविक्रम - गडदुर्गांच्या प्रतिकृती संकलनातून शिवरायांना वैश्विक मानवंदना

## शिवप्रताप दिनी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डची अधिकृत घोषणा

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्रात दुर्गपूजनाची परंपरा खोलवर रुजलेली असली तरी, ४०० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या राजाच्या स्मृती प्रित्यर्थ समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन अंगणात आणि सार्वजनिक जागांमध्ये शिवछत्रपतींच्या गडदुर्गांच्या प्रतिकृती बनवण्याची अनोखी परंपरा हे महाराष्ट्राचे विशेष वैशिष्ट्य आहे.

जगात इतरत्र कुठेही अशी ऐतिहासिक व भावनिक परंपरा आढळत नाही. बदलत्या काळानुसार परंपरेचे स्वरूप विस्तारावे, आधुनिक तंत्राचा उपयोग करून शिवप्रेम अधिक व्यापक व्हावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था अमृत यांनी 'दुर्गोत्सव २०२५' ही अभिनव संकल्पना साकारली.

युनेस्कोने शिवछत्रपतींच्या १२ गडदुर्गांना जागतिक वारसास्थळांच्या यादीत स्थान दिल्यानंतर दिवाळीत दुर्गउभारणी ही परंपरा नव्या उंचीवर नेण्यासाठी अमृतने आवाहन केले.




शक्य तितक्या घरोघरी आणि सार्वजनिक ठिकाणी दुर्गांच्या प्रतिकृती बनवाव्यात, त्यांचे छायाचित्र घेऊन दुर्गोत्सवच्या अधिकृत वेबसाईटवर अपलोड करावे आणि शिवभक्तांनी एकत्र येऊन जागतिक विक्रम करावा.

या आवाहनाला अपेक्षेपेक्षा मोठा प्रतिसाद मिळाला. देशभरातून संकलित केलेल्या हजारो दुर्ग प्रतिकृतींची छायाचित्रे अमृतने गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सकडे पाठवली. अखेर आज, १० नोव्हेंबर - शिवप्रताप दिन या ऐतिहासिक दिवशी गिनीजने हा उपक्रम अधिकृतपणे स्वीकारत जागतिक विश्वविक्रम घोषित केला. गिनीजच्या अधिकृत प्रतिनिधींनी अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना प्रमाणपत्र प्रदान केले.समारंभात बोलताना श्री विजय जोशी यांनी राज्य शासनाने दर्शविलेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या प्रोत्साहनाबद्दल विशेष आभार मानले. सहभागी झालेल्या लाखो शिवभक्तांचे मनःपूर्वक आभार मानत, दुर्गोत्सव हा वार्षिक सार्वजनिक उत्सव म्हणून अधिकाधिक भव्य स्वरूपात पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. गिनीजचे अधिकृत पंच श्री पटेल म्हणाले, योग्य छायाचित्रांची निवड, डुप्लिकेट किंवा चुकीचे फोटो वगळणे आणि सत्यता पडताळणी ही अत्यंत क्लिष्ट आणि वेळखाऊ प्रक्रिया होती; पण लोकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा विक्रम साकारला.

### बीड जिल्यात दुर्गोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

दुर्गोत्सव २०२५ या उपक्रमांतर्गत बीड जिल्ह्यात अमृत तर्फे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले. मा. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केलेल्या आवाहनानुसार जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, संस्था आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ५०० पेक्षा जास्त गडदुर्ग प्रतिकृती तयार केल्या आणि त्या संकलन मोहिमेत अपलोड केल्या. जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी, उपव्यवस्थापक दिगंबर जोशी, सुमित धिरडे आणि चिंतेश जोशी यांनी सर्व सहभागींचे मनःपूर्वक आभार मानले.

# चिकनगाव परिसरात अवैध वाळू उत्खननाचा पर्दाफाश


## महसूल अधिकाऱ्याच्या फिर्यादीवरून चार जणांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

अंबड /प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर अखेर महसूल विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे.अंबड तालुक्यातील चिकनगाव येथील सुकना नदी पात्रातून पाच लाख रुपयांची वाळू चोरी केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

ग्राम महसूल अधिकारी किशोर शिवनाथ गायकवाड, देशगव्हाण, चिकनगाव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवण्यात आला.दि.९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता मंडळ अधिकारी विलास राजपूत यांनी गायकवाड यांना फोनवर माहिती दिली की चिकनगाव परिसरात सुकना नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन सुरू आहे.

त्यानुसार महसूल अधिकारी गायकवाड,मंडळ अधिकारी राजपूत व कोतवाल शरद गट्टे हे दुपारी सुमारास घटनास्थळी पोहोचले असता नदीपात्रात आणि बाहेर ट्रॅक्टरच्या चाकांचे ठसे व मोठे खड्डे आढळले. प्राथमिक तपासात अंदाजे ८० ते १०० ब्रास वाळू, किंमत सुमारे ५ लाख रुपये अशी चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.गोपनीय बातमीदारांच्या माहितीनुसार दि. २५ ऑक्टोबर २०२५ रात्री ११ ते दि.७ नोव्हेंबर २०२५ सकाळी



६ या दरम्यान या कालावधीत वाळूचा उपसा करण्यात आला होता.महसूल अधिकाऱ्यांच्या खात्रीशीर तपासानंतर खालील आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंबर विठ्ठलसिंग माहेर रा. चिकनगाव,भिमसिंग विठ्ठलसिंग माहेर रा.चिकनगाव,सुदाम विठ्ठलराव लबडे रा.चिकनगाव,कल्याण बजरंग माहेर रा. चिकनगाव, या सर्वांविरुद्ध कलम ३७९ भा.दं.वि.,महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७), (८) तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन विकास व विनियमन नियम २०१३ आणि खाण अधिनियम १९५२ चे कलम ३ व ४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी प्रशासन कटिबध्द - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर ।प्रतिनिधी

दिव्यांगांप्रती सन्मान आवश्यक आहे. दिव्यांगासाठी आता स्वतंत्र विभागाची स्थापना झाली असल्याने त्यांना मिळणाऱ्या विविध योजनांचा लाभ सुलभ होण्यास मदत झाली असून जिल्हा प्रशासन दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी मंगळवारी केले.

जिल्हा प्रशासन व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात झालेल्या दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृती जिल्हास्तरीय कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, केंद्रीय सल्लागार मंडळाचे सदस्य सुरेश पाटील, जिल्हा न्यायालयाचे ज्येष्ठ विधीज्ञ ड.




श्रीराम देशपांडे, डॉ. राजेश पाटील, डॉ. योगेश निटुरकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यशाळेत विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यात ड. श्रीराम देशपांडे यांनी दिव्यांग व्यक्तीचे हक्क, स्पेशल कोर्ट, सुरेश पाटील यांनी दिव्यांग व्यक्ती समाज व प्रशासन यांची दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनामधील भुमिका, डॉ. योगेश निटुरकर यांनी आरोग्य् व पुनर्वसन, सतीश भापकर यांनी शिक्षण व पुनर्वसन, सुरज बाजुळगे यांनी सुगम्यतेबाबत मार्गदर्शन केले. यासह व्यंकट लामजने यांनी सेवा सुविधा व जिल्हास्तरावरील विविध समिती रचना व त्यांची कार्ये, विठ्ठल गाडेकर यांनी दिव्यांगाच्या कौशल्य विकासाबाबतचे मार्गदर्शन तर दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी विविध विभागाच्या रोजगार व नोकरी आरक्षण, निधीचा विनियोग याविषयी माहिती दिली.



# उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस पाटील सौ. सविता वादे यांचा सन्मान

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील उंद्री (प.दे.) येथील पोलीस पाटील सौ. सविता विजयकुमार वादे यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकांदरम्यान केलेल्या उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी मुखेड पोलीस ठाणे येथे झालेल्या समारंभात देगलूर उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी व पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या हस्ते सौ. वादे यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.निवडणुकांच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यात, गावातील नागरिकांशी समन्वय ठेवून शिस्तबद्ध कार्य पार पाडल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. सौ. सविता वादे यांच्या या सन्मानामुळे उंद्री (प.दे.) गावासह मुखेड तालुक्याचा अभिमान उंचावला असून, स्थानिकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# मतदार जनजागरण समितीच्या उपक्रमात सनदी लेखापाल परिक्षेत यश मिळाल्याबद्दल सबा शेख हिचा भारतीय संविधान उद्देशिका विश्लेषण प्रत व पुस्तक देऊन शुभेच्छा



धाराशिव /प्रतिनिधी

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत धाराशिव शहरातील समता नगर येथील सबा रियाजोद्दिन शेख हिने पहिल्याच प्रयत्नात सनदी लेखापाल परीक्षेत यश मिळविल्या बद्दल मतदार जनजागरण समिती व फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधान उद्देशिका विश्लेषण प्रत व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संसद भवन मधील संविधान सभेतील भाषण असलेले पुस्तक,शाल व पेढे भरवुन सत्कार करण्यात आला.

राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त तब्बसुम सय्यद यांच्या हस्ते शाल देण्यात आली,मुस्लिम समाजातील मुलीचे यश हे धाराशिव करांसाठी अभिनंदनीय बाब आहे, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील बाजूस सबा यांच्या वडिलांनी पान टपरी चालवुन आपल्या मुलीचे शिक्षण पुर्ण करुन इतरांसाठी आदर्श निर्माण केला,रियाजोद्दिन यांच्या कष्टांची जाणीव ठेवून सबा हिने ही शहरातीलच दिपक भातभागे यांच्या कार्यालयात शिक्षणासोबत काम करीत यश मिळविले,मान्यवरांनी आपापल्या मनोगतात सबाला शुभेच्छा दिल्या,यात प्रामुख्याने राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त तब्बसुम सय्यद,अब्दुल लतीफ, अंकुश उबाळे, गणेश वाघमारे,बलभीम कांबळे,प्रविण जगताप, बाबासाहेब गुळीग,श्रीकांत मटकिवाले,कुंदन चिलवंत,श्री कुलकर्णी,योध्दा सामाजिक संस्था येडशीचे अध्यक्ष सरफराज पटेल, अतुल लष्करे,भारतीय बौद्ध महासभेचे विजय बनसोडे,राजाभाऊ बनसोडे,अजहर शेख,फयाजोद्दिन शेख,सबाचे मामा सह मतदार जनजागरण समिती व फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीचे सदस्य उपस्थित होते,प्रस्तावना अब्दुल लतीफ यांनी तर आभार गणेश वाघमारे यांनी मानले.

माऊली ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त

# डॉ.कपूर यांच्या निवासस्थानी घरपोच 'ज्ञानेश्वरी ग्रंथ स्नेह भेट' कार्यक्रम उत्साहात संपन्न

बीड ।प्रतिनिधी

माऊलीम महावैष्णव संत श्री.ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'ज्ञानेश्वरी ग्रंथ घरपोच स्नेह भेट' या उपक्रमाचा एक प्रेरणादायी आणि भक्तिमय सोहळा काल दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी गोरज मुहूर्तावर दुबे कॉलनी, खंडेश्वरी रोड येथे डॉक्टर विक्रमसिंह कपूर यांच्या निवासस्थानी मोठ्या आनंदात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

या प्रसंगी९९९ ज्ञानदेव तुकाराम या जयघोषात आणि हरिनामाच्या गजरात छोटी दिंडी काढून ज्ञानेश्वरी ग्रंथाचे स्वागत करण्यात आले. कपूर दांपत्याने भक्तीभावाने ग्रंथाचे पूजन पूजन केले. यानंतर ह.भ.प. माधव महाराज डाके (बीड) यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी ग्रंथाची विधीवत पूजा करण्यात आली. पंचारती प्रज्वलित दिव्याच्या पिवळसर मंद प्रकशात करून श९९ या प्रसगी डॉ. कपूर कुटुंबातील विक्रमसिंह कपूर , वर्षा कपूर, श्रद्धा ताई चौहाण,अनिताताई सादरे,हनुमान सदरे,श्रुती कपूर, पूर्वी कपूर, जागृती कपूर, व सर्व सदस्य, दुबे कॉलनीतील माता-भगिनी, तसेच लहान मुले उपस्थित होती. सर्वांनी हरिनाम गात भक्तीमय वातावरण निर्माण केले. कार्यक्रमात ज्ञानेश्वरी ग्रंथ घराघरांत पोहोचविण्याच्या या उपक्रमाचे महत्त्व आणि उद्दिष्ट याविषयीही चर्चा झाली.

कार्यक्रमाची सांगता 'पसायदान' पठणाने झाली. जे सुकृत आहे त्याची फळे लाभोत, सर्व लोक सुखी होवोत असा मंगल संकल्प व्यक्त करण्यात आला. शेवटी दैनिक चंपावती पत्रचे महादेव नाना साळुंके यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी या कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करत ज्ञानेश्वरी घरपोच ग्रंथ भेट हा उपक्रम प्रचार आणि प्रसार ,समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी राबविण्यात येत असल्याचे सांगितले. त्यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून या उपक्रमाला पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमानंतर उपस्थित सर्वांनी प्रसादाचे सेवन करून भक्तिमय वातावरणात सोहळ्याची सांगता झाली.



# आम आदमी पार्टीचा ए-फॉर्म जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल

## अश्विन नलबले सहप्रभारी मराठवाडा आम आदमी पार्टी

बीड ।प्रतिनिधी

आम आदमी पार्टीच्या वतीने बीड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद निवडणुका स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, आम आदमी पार्टीचे मराठवाडा सहप्रभारी मा. अश्विनजी नलबले यांनी बीड येथे येऊन जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभागात स्वतः उपस्थित राहून ए-फॉर्म दाखल केला.या वेळी आम आदमी पार्टी बीड जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे व शहरप्रमुख सय्यद सादेक उपस्थित होते. फॉर्म दाखल झाल्यानंतर त्याची प्रत जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.या प्रसंगी श्री. अश्विन नलबले यांनी सांगितले की, आम आदमी पार्टी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जोमाने लढणार असून, कोणत्याही प्रकारची अडचण आली तर आम्ही ती सोडविण्यासाठी सदैव तत्पर आहोत. त्यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवत चांगले मार्गदर्शन केले आणि त्यानंतर धाराशिव व लातूर दौऱ्यावर प्रस्थान केले.

# उद्योगपती सरपंच परिवंत गायकवाड महाराष्ट्र भुषण राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानीत



आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील आदर्श गाव क-हेवडगावचे सरपंच, उद्योगपती परिवंत गायकवाड यांना अलिकडेच महाराष्ट्र भुषण आदर्श सरपंच राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर झाला होता. सातारा जिल्ह्यातील खटाल तालुक्यातील वडूज येथे रविवार दि. ८ नोव्हेंबर रोजी ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या हस्ते सरपंच परिवंत उत्तम गायकवाड यांना पुरस्कार प्रदान करुन सन्मानीत करण्यात आला.

क-हेवडगाव या छोट्या गावाला हा मोठा सन्मान मिळाला आहे. क-हेवडगाव गावचे कार्यतत्पर आणि समाजसेवेचा वसा घेतलेले सरपंच परिवंत उत्तम गायकवाड यांना महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार देण्यात आला आहे. या गौरवामुळे केवळ क-हेवडगावच नव्हे तर संपूर्ण आष्टी तालुक्याची मान उंचावली आहे. कोरोना काळात जेव्हा सर्वत्र भय आणि अनिश्चिततेचे वातावरण होते तेव्हा सरपंच परिवंत गायकवाड यांनी सेवा हीच श्रद्धा या भावनेतून ग्रामस्थांना किराणा किट, मास्क व सॅनिटायझरचे वाटप करून मानवता जापली आहे. क-हेवडगाव येथे विविध जयंती, उत्सव, सामाजिक उपक्रम, हरिनाम सप्ताह आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी पुढाकार घेत महापंगत, अन्नदान केलेले आहे. विद्यार्थीना शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे. अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवा केली आहे व करीत आहेत.

सरपंच गायकवाड यांच्या कार्यातून समाजाच्या प्रत्येक घटकाला स्पर्श करणारा संवेदनशील दृष्टीकोन दिसून येतो. नेत्रदान शिबिरांचे आयोजन करून लोकांना जनजागृती केली. चष्मे वाटप केले. रुग्णांना स्वखर्चाने पुणे, अहिल्यानगर, मुंबई येथे नेत्रदानासाठी निवड झालेल्या शस्त्रक्रियासाठी दाखल होण्यासाठी बसभाड्याची व निवासाची सोय केली आहे. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, अन्नदान, किराणा किट वाटप आणि गोरगरीबांसाठी आर्थिक मदत हे त्यांच्या सततच्या कार्याचे वैशिष्ट्य ठरले आहे. दिवाळी, पाडवा, जयंती प्रत्येक सणासुदीला ते जनतेसोबत असतात. सेवाभाव हा गायकवाडांचा संकल्प आहे. गेल्या २५ वर्षांपासून आ. सुरेश धस यांचे कट्टर समर्थक म्हणून परिवंत गायकवाड हे राजकीय कार्य करीत आहेत. सरपंच गायकवाड हे जनहिताला सदैव प्राधान्य देतात. त्यांच्या या निःस्वार्थ, विकासाभिमुख आणि मानवता, सेवाभावाचा गौरव म्हणून महाराष्ट्र भूषण हा मानाचा पुरस्कार गायकवाड यांना मिळाला आहे.

या पुरस्काराबद्दल आ. सुरेश धस, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, माजी सभापती अरुणभैय्या निकाळजे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, शरद रेडेकर, माजी सरपंच रामशेठ मधुरकर, माजी नगरसेवक सादिक कुरेशी, डॉ. युवराज तुपे, सेवानिवृत पोलीस निरीक्षक मिलिद निकाळजे, दिलीप राऊत, दिपक निकाळजे, रुपेश निकाळजे, राजेंद्र बोरुडे, सोमीनाथ विधाते, राजेंद्र लाड, क-हेवडगाव ग्रामस्थ, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले. डीएसपी न्युज लाईव्ह चॅनलच्या वतीने सरपंच परिवंत गायकवाड यांना हा पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

# कुंडलिक खांडेंचा पुन्हा शिवसेनेत प्रवेश; स्वत: ठाकरेंनी बांधले शिवबंधन

## पक्षप्रवेशानंतर जिल्ह्यात शिवसेना जोमाने वाढविण्याचे ठाकरेंचे खांडे यांना आदेश, बीडचे राजकिय गणित बदलणार

मुंबई ।प्रतिनिधी

पंचविस वर्षांपुर्वी कुंडलिक खांडे यांनी शिवसेनेतून राजकारणाला सुरूवात केली. मध्यल्या काळात ते शिवसेनेपासून दूर होते. परंतु पुन्हा त्यांनी शिवसेना पक्षप्रमूख उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत दि.११ नोव्हेंबर रोजी मुंबईत मातोश्रीवर जावून शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी उध्दव ठाकरे यांनी त्यांच्या हाती शिवबंधन बांधून बीड जिल्ह्यात शिवसेना वाढविण्याची जबाबदारीही सोपविली. दरम्यान, कुंडलिक खांडे यांच्या प्रवेशाने जिल्ह्यातील राजकारण बदलणार आहे.

यावेळी विरोधी पक्ष नेते आ.अंबादास दानवे, सुभाष देसाई, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती. कुंडलिक खांडे यांच्या शिवसेना प्रवेशाने बीड जिल्ह्यातील राजकारणाचे गणित बदलणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या घोषणेनंतर



राज्यभरात आता मोठ्या घडामोडी घडत आहेत. याच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला आहे. सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह मंगळवार दि.११ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील मातोश्री बंगल्यावर शिवसेनेत प्रवेश केला. खांडे यांच्या शिवसेना पक्ष प्रवेशामुळे बीड विधानसभा मतदारसंघ तसेच बीड जिल्ह्यातील राजकारण चांगलेच बदलणार आहे. पक्षप्रवेशावेळी उध्दव ठाकरे म्हणाले, आपण गोपीनाथ मुंडे यांच्यावरील प्रेमापोटी आतापर्यंत बीड जिल्ह्यात भाजपला झुकते माप दिले. पण आता बीड जिल्ह्याची पूर्णत: विल्हेवाट लागली आहे. तिकडे कुणीच कुणाचे नाही. अशावेळी सर्वसामान्य जनतेच्या पाठिशी उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे. जनतेकडूनही आपल्याला मोठी अपेक्षा आहे. शिवसेना मला पूर्वीपेक्षा जास्त वैभवशाली पाहिजेच. याचा अर्थ जनता आपल्यासोबत आली पाहिजे. त्यासाठी आपण मेहनत घेतली पाहिजे, असेही ते म्हणाले. यावेळी कुंडलिक खांडे यांनी आपण राजकारणाची सुरूवातच शिवसेनेतून केलेली असून आता आयुष्यभर शिवसैनिक म्हणून काम करू, जिल्ह्यात शिवसेना वाढवून दाखवू, असा शब्दही त्यांनी यावेळी ठाकरेंना दिला.

# कैलास तुपे राज्यस्तरीय शिक्षक वक्तृत्व स्पर्धेत विजेते

## मानूर गावासाठी अभिमानाची बाब

मानूर /प्रतिनिधी ह्व

नालंदा फाउंडेशन बीड, आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या व्यासपीठावर मानूरचे भुमिपुत्र शिवचरित्रकार कैलास तुपे तृतीय क्रमांक मिळवत विजेते ठरले. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७ नोव्हेंबर शाळा प्रवेश दिनानिमित्त नालंदा फाउंडेशन बीड यांनी महाराष्ट्र राज्यातील शिक्षकांसाठी खुली राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा ९ नोव्हेंबर रोजी तुलसी शैक्षणिक समूह बीड येथे आयोजित केली होती. यामध्ये राज्यातून अनेक जिल्ह्यातील शिक्षक स्पर्धक म्हणून सहभागी झाले होते. मूल्यशिक्षण संस्कारात शिक्षकाची भूमिका या विषयावर कैलास तुपे सर यांनी मांडलेले विचार परीक्षकांना प्रभावित करण्यात यशस्वी झाले. जग




बदलणारा बाप माणूस या पुस्तकाचे प्रसिद्ध लेखक जगदीश ओहोळ, नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रदीप रोडे सर, उपायुक्त सोनवणे साहेब व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये १० नोव्हेंबर रोजी तुलसी आय.टी.आय. कॉलेज बीड येथे पारितोषिक वितरण सोहळा थाटामाटात संपन्न झाला. कैलास तुपे हे प्राथ. शिक्षक म्हणून जि.प.के. प्रा. शा. जाटनांदूर ता. शिरूर कासार येथे सध्या कार्यरत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात गुणवंत विद्यार्थी घडवण्याबरोबरच ते उपक्रमशील शिक्षक म्हणून बीड जिल्ह्यात ओळखले जातात. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रभावी व्याख्याने ते देतात. उत्कृष्ट सूत्रसंचालक म्हणूनही त्यांनी नावलौकिक मिळवलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये हे गुण उतरवण्यासाठी ते नेहमी धडपडत असतात. आत्तापर्यंत त्यांना अनेक राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. अत्यंत मानाची असणारी ही नालंदा फाउंडेशन ची राज्यस्तरीय शिक्षक वक्तृत्व स्पर्धेत त्यांनी विजय प्राप्त करत शिरूर तालुक्याचा गुणगौरव वाढवल्याने सर्व क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे.

शेतकऱ्यावरती इंद्र, देवेंद्र आणि नरेंद्र यांच्या प्रकोपामुळे

# पदरी आले दारिद्र्, हिंदू धर्म भूषण श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ

जाफराबाद /हरी भालके

जालना जिल्ह्यातील सावरगाव या गावी एक दिवशी शेतकरी मेळाव्याचे आयोजन गणपती माळावरती करण्यात आले होते यामध्ये आधुनिक शेती मध्ये होणारे बदल रासायनिक शेती व सेंद्रिय शेती या विषयावरती वाघमारे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले याप्रसंगी गोरक्षण समिती प्रदेश अध्यक्ष हिंदू धर्म भूषण श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील यां ची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन प्राप्त झाले याप्रसंगी आपले विचार व्यक्त करीत असताना शेतकरी म्हणजे भारताचा खरा कणा आहे तो आपल्या कष्टाने संपूर्ण देशाचे पोषण करतो आपण रोज सकाळी उठून चहा पोळी, भात, डाळ, फळे, दूध, याचे नित्य सेवन करतो परंतु त्या मांगे उभा असलेल्या शेतकऱ्याचा संघर्ष याचा विचार करी तो का


जगाचा पोशिंदा शेतकरी आहे परंतु त्याचा आदर आणि कदर कोणी करीत नाही खरंतर लाख मेले तर चालतील परंतु लाखाचा पोशिंदा जगला पाहिजे आणि तोच वाटेवरती आलेला आहे ही मोठी खंत आहे शेतकरी हा केवळ अन्न दाताच नसून देशाच्या आर्थिक, सामाजिक जीवनाचा गाभा आहे या वर्षात तोंडी आलेला एकाचा घास वेळेवरती वादळी वारे विजा पावसाने मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी केली यामुळे पिकाचे प्रचंड नुकसान झाले मर्यादा ओलांडून एक प्रकारे निसर्ग किंबहुना स्वर्गाचा राजा इंद्र जिंकला कर्जमाफी न देऊन खोटे बोलून देवेंद्र जिंकला आणि उरल्या पिकाला भाव न देऊन केंद्रातील नरेंद्र जिंकला हरला तो फक्त शेतकरी चौफेर व जुने शेतकऱ्यावरती दुःखाचा डोंगर कोसळला म्हणून मायबाप शेतकऱ्यावरती इंद्र, देवेंद्र , आणि नरेंद्र यांच्या प्रकोपामुळे पदरी दारिद्र्य प्राप्त झाल्याचे स्पष्ट मत यावेळी हिंदू धर्मभूषण श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील यांनी यावेळी व्यक्त केले तसेच शेतकरी पुत्रांनो व माझ्या मित्रांनो घाबरू नका जमिनी विकू नका शेतकरी नवरा नको नोकरीवाला पाहिजे परंतु येणारा काळ शेती वाल्याचाच आहे ज्याच्याकडे असेल शेती तोच बनेल माझा पती असे होणार असल्यामुळे चिंता नको चिंतन करा दिवस आपले ही येणार असल्याचे विधान यावेळी नंदकिशोर जी महाराज वायाळ यांनी व्यक्त केले यावेळी मंचावरती खिल्लारे साहेब वाघमारे साहेब मरकड पाटील बाबुराव जी कायंदे वाघमारे मॅडम साळवे मॅडम दिनेश सोमानी रघुनाथ बाबा देशपांडे धनंजय देशपांडे व कारकर यासह कृषी सेवक पदाधिकारी व शेतकरी व मोठ्या संख्येने उपस्थित होते चतुर्थी असल्याकारणाने चहा फराळाचे वाटप करून विघ्नहर्ता गणपती आरतीने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# माणुसकीचा मंत्र जपणाऱ्या गणेश अंबेकर यांच्या समाजसेवेची दखल

## विद्यार्थ्यांच्या चप्पला मोफत दुरुस्त करून देणारा आधुनिक काळातील महारथी

आष्टी (प्रतिनिधी)

सध्याच्या प्रचंड स्वार्थी जमान्यामध्ये किंबहुना स्वत:च्याच नव्हे तर भविष्यातील दहा दहा पिढ्यांची सोय करून देणाऱ्या हावरट मनाच्या माणसांच्या जमान्यात अत्यंत गरिबीत जीवन जगून रक्ताचे पाणी करून दैनंदिन जीवन जगणाऱ्या माणसातील माणुसकी संवेदनशील मनाला अंतर्मुख करणारी आहे. आष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये गेल्या अनेक दशकापासून एक ६० वर्षाचा




गृहस्थ अत्यंत प्रमाणिकपणे आपली पायातील बूट चप्पल दुरुस्तीची सेवा बजावत आहे. विशेष म्हणजे विद्यार्थीना मोफत सेवा देणारा महारथी सर्वांचे लक्ष वेधतो आहे. गरीब घरच्या विद्यार्थ्यांना शिकता येत नाही म्हणून शासनाच्या योजना असतात परंतु त्याचा डांगोरा मात्र अधिक असतो. श्रीमंत माणसे थोडीशी मदत करतात आणि प्रसिद्ध अधिक करतात परंतु गणेश अंबेकर मात्र आजपर्यंतच्या आयुष्यात कोणाच्या दृष्टीस पडले नाहीत परंतु झुंजारनेता या वृत्तपत्राचे ज्येष्ठ उपसंपादक आणि आष्टी तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांच्या दृष्टीतून गणेश अंबेकरांची विद्यार्थी सेवा सुटली नाही. त्यांनी तात्काळ त्यांच्या या सेवेची दखल घेत विद्यार्थ्यांचे चप्पल बूट शिवून देतानाचा हा क्षण आपल्या मोबाईल कॅमे-यात टिपला. आपल्या शब्दातून संवेदनशील बातमी करून झुंजारनेतात छापली आणि पाहता पाहता हजारो जणांनी या बातमीतील गणेश अंबेकरांच्या विद्यार्थी सेवेचे मनभरून कौतुक केले. अजूनही माणुसकी जिवंत आहे. प्रामाणिक आणि समाधान मानून जगणारे लोक बोटावर मोजण्या ईतके तरी आहेत. हे या निमित्ताने आधोरेखित झाले. काल दुपारी उत्तमराव बोडखे यांनी गणेश अंबेकर यांना झुंजारनेता मधील प्रसिध्द झालेल्या बातमीचे कात्रण दिले.



आष्टी - रियान रिजवान शेख यास वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, माजी सरपंच अहमद शेख, जेष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, प्रविण झांबरे, रिजवान काझी, ड. अक्रम सय्यद, ड. मुकरम सय्यद, इंजिनिअर शहाबाज सय्यद, ड. याशिर सय्यद, भैरवनाथ चव्हाण, तांबोळी सर, युसुफ सय्यद,गणीभाई सय्यद, समीर सय्यद,आबेद सय्यद आदी दिसत आहे.

# सैनिकी विद्यालयात आद्य क्रांतिकारक राघोजीराव भांगरे यांची जयंती संपन्न



बीड ।प्रतिनिधी

सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड येथे आद्य क्रांतिकारक राघोजीराव भांगरे यांची जयंती साजरी करण्यात आली अशी माहिती प्राचार्य श्री सचिन पवार सर यांनी दिली. सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य सचिन पवार यांच्या अध्यक्षतेखाली आद्य क्रांतिकारक राघोजीराव भांगरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी राघोजीराव भांगरे यांच्या कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले तर प्राचार्य श्री पवार सर यांनी राघोजीराव भांगरे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . यावेळी सैनिकी विद्यालयातील उपप्राचार्य रवींद्र झोडगे व उप मुख्याध्यापक महेबूब पठाण सर व विद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नामदेव साळुंखे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री गणेश निर्मळ सर यांनी केले.

# सांगवी (पा.) येथे श्री भैरवनाथ जन्माष्टमी सोहळ्याचे उत्साहात आयोजन

आष्टी - (प्रतिनिधी) पंचक्रोशीतील भाविकांच्या उपस्थितीत मौजे सांगवी (पा.) ता.आष्टी येथे श्री भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा १२ ते १३ नोव्हेंबर २०२५ या दोन दिवशी उत्साहात साजरा होत आहे. भक्तिमय वातावरण, धार्मिक कार्यक्रमांची चुरस, भजनी मंडळांचा सहभाग आणि महाप्रसादाच्या महिमा यामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

पहिल्या दिवशी बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजता क्षेत्र काशी, पैठण, नागतळा येथून आलेल्या कावडींची मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री ९ ते १० दरम्यान विनोदाचार्य ह. भ. प. भाऊसाहेब महाराज पन्हाळकर यांनी भाविकांना कीर्तनातून अध्यात्म आणि भक्तीची प्रेरणा देणारे कीर्तन होणार आहे. रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत काशीनाथ जाधव व सहकारी यांनी नाथजन्म आख्यान सादर होणार आहे. मध्यरात्री १२ वाजता श्रींचा लघुरुद्राभिषेक, पुष्पवृष्टी व कावडीचे पाणी असा प्रमुख सोहळा संपन्न होणार आहे.

गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते ९ या वेळेत ग्रामस्थांकडून नैवेद्य, नारळ, शेरणी वाटप करण्यात आले. सकाळी ९ ते ११ या वेळेत ह. भ. प. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्रीयांचे हरिकीर्तन होणार आहे. दुपारी १२.३० ते १ वाजता श्रींची सवाद्य मंदिर



प्रदक्षिणा व शोभेची आतिषबाजी यांचे आयोजन करण्यात आले. सोहळ्याची सांगता सकाळी ११.३० वाजता महाप्रसादाने होणार आहे. महाप्रसादासाठी श्री. दादाराव सोनाजी खोटे, श्री. बिभीषण साहेबराव गवारे, श्री. मारुती त्रिंबक भोसले यांचे विशिष्ट योगदान राहिले. भजनी मंडळ, गायक, मृदंगाचार्य, कावडी फराळ पंगत, शोभेची दारू, मंडप - लाईट डेकोरेशन, पिण्याचे पाणी, फुलांची सजावट, छायांकन आदी विविध सेवेसाठी अनेक मान्यवरांनी सहकार्य केले. तसेच उदार देणगीदारांनी दिलेल्या अर्पणामुळे सोहळ्याला अधिक भर पडली.समस्त श्री भैरवनाथ भक्त, सांगवी (पा.) आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या पुढाकारातून हा सोहळा यंदाही भक्तिमय वातावरणात, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण पार पडत आहे. भक्तांच्या वाढत्या सहभागामुळे सांगवीतील भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा हा परिसरातील एक महत्त्वाचा धार्मिक उत्सव म्हणून ओळखला जात आहे. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी भैरवनाथ जन्माष्टमीच्या लाभ घ्यावा अशी सांगवी पाटण ग्रामस्थांच्या वतीने विनंती



आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर नाना हंबर्डे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, आदर्श शिक्षक राजेंद्र लाड सर दिसत आहेत.

# मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या त्रासाबाबत शिवकर्म प्रतिष्ठानकडून नगरपरिषदेला निवेदन

गेवराई /प्रतिनिधी

नगरपरिषद कॉलनी, कोल्हे रोड परिसरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या मोकाट कुत्र्यांच्या संख्येमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असून, या पार्श्वभूमीवर शिवकर्म प्रतिष्ठान, गेवराई तर्फे नगरपरिषद मुख्याधिकारी, गेवराई यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये परिसरातील मोकाट कुत्र्यांनी लहान मुलांवर तसेच घरातील पाळीव प्राण्यांवर हल्ले केल्याच्या घटनांचा उल्लेख करण्यात आला असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने आवश्यक ती उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना शिवकर्म प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. नितीन शेटे, तसेच श्री.आसेफ शेख, श्री. अमोल साळवी, अल्तमश बागवान, मुख्तार इनामदार, सोहेल बागवान,आरशान शेख, आदी सदस्य उपस्थित होते.या प्रसंगी शिवकर्म प्रतिष्ठान तर्फे



सांगण्यात आले की, मोकाट कुत्र्यांच्या त्रासामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरपरिषदेकडून कुत्र्यांचे पकडणे, लसीकरण व सुरक्षित ठिकाणी व्यवस्था करण्यासारखी पावले उचलावीत, अशी मागणी प्रतिष्ठानने केली.शिवकर्म प्रतिष्ठानचे कार्यकर्ते नागरिकांच्या अडचणींचे निराकरण व सामाजिक प्रश्नांबाबत नेहमीच तत्पर असतात, असेही या वेळी सांगण्यात आले.

# देवगाव फाट्यावर 'मी रमाई' एकपात्री प्रयोगाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## रडणारी नव्हे, लढणारी रमाई - प्रेक्षकांच्या डोळ्यात आले अश्रू!

डॉ. आशिष तिवारी / मंठा

बुद्धभूमी चॅरिटेबल ट्रस्ट आणि प्रकाश वाघ निर्मित मी रमाई या एकपात्री नाट्यप्रयोगाने देवगाव फाटा येथे प्रेक्षकांना भावनिक केले. माता रमाबाई आंबेडकर यांच्या खडतर जीवनप्रवासावर आधारित या प्रयोगाने प्रेक्षकांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

रमाईच्या आयुष्यातील संघर्ष, संकटांतील त्यांची जिद्द, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक लढ्यातील त्यांचे योगदान याची प्रभावी मांडणी रंगमंचावर करण्यात आली. विशेषतः आपल्या मुलांच्या मृत्यूप्रसंगी रमाईचा आक्रोश दाखवणारा प्रसंग पाहून सभागृहातील वातावरण क्षणभर स्तब्ध झाले.

अभिनेत्री प्रियंका उबाळे-वाघ यांनी आपल्या प्रभावी अभिनयातून रमाईचे चरित्र जिवंत केले. रडणारी नाही, तर लढणारी रमाई या संदेशाद्वारे



त्यांनी स्त्रीच्या धैर्य, त्याग आणि संघर्षशील वृत्तीचा सन्मान केला. या प्रयोगाला आतापर्यंत २५ हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

या कार्यक्रमाला दिग्दर्शक प्रा. रमाकांत भालेराव आणि चित्रकार देवदास भंडारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी प्रियंका यांच्या अभिनयाचे कौतुक करत म्हटले की, रमाई म्हणजे जिवंत इतिहास रंगमंचावर उतरल्याचा अनुभव झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, कार्याध्यक्ष अखिल भारतीय भिक्खू संघ यांच्या हस्ते झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपनगराध्यक्ष अरुणभाऊ वाघमारे, दत्ता बनसोडे, बाळासाहेब अंभीरे, उद्धव सरोदे, प्रा. आर.एस. गायकवाड, रवी सदावर्ते, भीमराव वाघ, विजेष वाघमारे यांसह आयोजन समितीतील सदस्यांनी मोठी मेहनत घेतली.

कार्यक्रमास मंठा व जिंतूर तालुक्यातील नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली. शेवटी अरुणभाऊ वाघमारे यांनी सांगितले की, मी रमाई या प्रयोगाने केवळ मनोरंजन नाही तर स्त्रीच्या लढाऊ वृत्तीचा सन्मान करून समाजात प्रेरणा निर्माण केली आहे.

# महा ई सेवा आधार केंद्र चालकांचा तीन दिवसीय राज्यव्यापी संप

## शासनाच्या उदासीन धोरणाविरोधात असहकाराची भूमिका घनसावंगी येथे तहसीलदारांना निवेदन सादर



घनसावंगी /प्रतिनिधी :-

राज्यातील महा ई सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र आणि आधार सेवा केंद्र चालकांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी १२ ते १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत तीन दिवसांचा राज्यव्यापी संप पुकारला आहे. या पार्श्वभूमीवर अखिल स्तरीय महा ई सेवा व आधार सेवा केंद्र संघटनेच्यावतीने घनसावंगी तहसीलदार कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.

डिजिटल सेवेतील योगदानानंतरही सापत्न वागणूक

संघटनेचे तालुका अध्यक्ष बालू तौर व तालुका उपाध्यक्ष विजयराज पवार यांच्या नेतृत्वाखाली केंद्र चालकांनी तहसीलदारांना निवेदन देत शासनाकडे आपल्या मागण्यांचा जोरदार पद्धतीने पाठपुरावा केला.निवेदनात नमूद करण्यात आले की महा ई सेवा आणि आधार सेवा केंद्रांमुळे नागरिकांचा वेळ श्रम आणि पैसा वाचतो शासनाचे उत्पन्न वाढते. मात्र या केंद्रांना शासनाकडून केवळ सापत्न वागणूक दिली जात आहे. वर्षानुवर्षे मागण्यांची दखल घेतली जात नाही.

न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातही महा ई सेवा संघटनेकडून रिट याचिका दाखल करण्यात आली असूनही शासनाने कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही.आर्थिक आधाराशिवाय सेवा देणे अशक्य

संघटनेचे राज्य प्रतिनिधी मा. विनोद तांबडे यांनी सांगितले की

आम्ही शासन आणि नागरिक यांच्यातील डिजिटल दुवा आहोत पण आम्हाला ना आर्थिक आधार, ना सुरक्षा.

तुटपुंजे कमिशन तेही तीन-तीन महिन्यांनी मिळते.अशा परिस्थितीत केंद्र चालकांचा उदरनिर्वाह करणे अवघड बनले आहे.त्यांनी पुढे सांगितले की शासनाचे लक्ष वेधण्यासाठीच हा संप पुकारण्यात आला असून शासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.नागरिकांना अल्प गैरसोय पण व्यापक पाठिंबा अपेक्षित

या संपामुळे काही काळ नागरिकांना शासकीय सेवांमध्ये गैरसोय होण्याची शक्यता आहे. तथापि संघटनेने नागरिकांना सहकार्याचे आवाहन करत म्हटले आहे की हा आंदोलन आमच्या हक्कासाठी आहे शासनाचे दुर्लक्ष थांबवण्यासाठी आहे. नागरिकांनीही यात आमचा आवाज बनावे. २७ मागण्यांसाठी लढा काही प्रमुख मागण्या

शासन निर्णय परिपत्रक दि. ०२/०६/२०२५ व दि. १०/१०/२०२५) पुनरावलोकन करून फेरबदल करावेत.,

नवीन आपले सरकार सेवा केंद्र देऊ नयेत.आधार सेवा केंद्रांचे थकीत कमिशन त्वरित अदा करावे.ऑपरेटरना ब्लॅकलिस्ट करू नये व प्रशिक्षणाची सोय करावी.जुन्या मशीनरीच्या जागी नवीन संगणक,स्कॅनर,उपकरणे द्यावीत. केंद्र चालकांना मासिक मानधन आणि विमा संरक्षण योजना लागू कराव्यात.

केंद्र चालकाचा मृत्यू झाल्यास केंद्राचे हक्क कुटुंबाकडे हस्तांतरित करावेत.

सी.एम.एस.,महा ऑनलाईन, महा आयटीकडील थकीत कमिशन तसेच लाडकी बहीण, पीक कर्ज,पीक विमा यांसारख्या योजनांचे मानधन त्वरित देण्यात यावे.लोकसंख्येच्या आधारे केंद्रांची संख्या नियंत्रित ठेवावी.

महा ई सेवा केंद्रांना गाळा,वीज व इंटरनेट सेवा मोफत उपलब्ध करून द्यावी.महाफूड लॉगिन मध्ये रेशन कार्डचे काम पुन्हा सुरु करण्यास परवानगी द्यावी.

शासनाला इशारा मागण्या मान्य करा नाहीतर संप वाढवू

संघटनेने स्पष्ट केले आहे की शासनाने या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले नाही तर आंदोलनाचा पुढील टप्पा अधिक तीव्र केला जाईल.

संपाच्या काळात राज्यभरातील सर्व महा ई सेवा आणि आधार केंद्रांवर कामकाज बंद राहणार असून,



# अँड.बापुजी जाधव यांचे शिवसेना (शिंदे गट) शेतकरी आघाडी बीड जिल्हाप्रमुखपदी निवड

बीड/प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे गटाच्या शेतकरी आघाडीच्या बीड जिल्हाप्रमुखपदी अँड. बापुजी जाधव यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून हार्दिक स्वागत करण्यात आले. यावेळी भारतीय जनता मजूर संघाचे राष्ट्रीय सचिव तथा नमो संघाचे प्रदेशाध्यक्ष भाऊसाहेब घोडके,ऊसतोड कामगार कृती समितीचे निमंत्रक तसेच लेक लाडकी अभियानाचे प्रणेते बाजीराव ढाकणे आणि दैनिक आत्ताच एक्स्प्रेसचे बीड जिल्हा प्रतिनिधी किशोर देवा कुलकर्णी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

शेतकरी हक्क,प्रश्न आणि त्यांच्या न्यायासाठी आवाज बुलंद करण्याचे काम पुढे अधिक जोमाने सुरू राहील,असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.तसेच जिल्ह्यातील शेतकरी संघटनात्मक दृष्ट्या अधिक सक्षम व्हाव्यात यासाठी नियोजनबद्धरीत्या काम करण्याचा निर्धार अँड. जाधव यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात मान्यवरांनी जाधव यांना शुभेच्छा देत आगामी भूमिका प्रभावी पणे पार पाडण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. तसेच पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## महापुरग्रस्तांसाठी तातडीची मदत द्या

# शहागड,वाळकेश्वर,गोरी गांधारी, डोमलगाव ग्रामस्थांची तहसीलदारांकडे धाव निवेदनाद्वारे तातडीच्या मदतीची मागणी

अंबड /प्रतिनिधी

सप्टेंबर महिन्यात झालेल्या गोदावरी नदीच्या महापुरामुळे अंबड तालुक्यातील शहागड, वाळकेश्वर,गोरी गांधारी आणि डोमलगाव या गावांतील नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले. शेकडो कुटुंबांना महापुराचा मोठा तडाखा बसल्याने या पीडित कुटुंबांना तातडीने शासकीय मदत मिळावी,या मागणीसाठी आज तहसीलदार विजय चव्हाण यांना निवेदन देण्यात आले.

पूरामुळे या गावांमध्ये अनेकांचे घरांचे, शेतीचे तसेच जनावरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले की पूरग्रस्तांना अद्याप मदत



मिळालेली नाही.शासकीय सहाय्य न मिळाल्यास कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल

असा गंभीर इशारा देण्यात आला आहे.या निवेदनाचे नेतृत्व भाजप तालुका अध्यक्ष शिवाजी नाना मोरे यांनी केले. त्यांच्या सोबत अनिरुद्ध अण्णा झिंजुर्डे, भगवानदादा बर्वे,इम्रान भाई पठाण,शेख खुद्दस,नारायण बरबडे,अमित गायकवाड, आप्पासाहेब शिंदे,अर्जुन कासोळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.प्रतिनिधीमंडळाने तहसील कार्यालयात दाखल होत पूरग्रस्तांच्या वेदना आणि त्यांच्या अडचणींची सविस्तर माहिती दिली.निवेदन स्वीकारताना तहसीलदार विजय चव्हाण यांनी पूरग्रस्तांच्या अडचणींची दखल घेतली आणि सांगितले की

पूरग्रस्त गावांचा सविस्तर अहवाल तयार करून तातडीने वरिष्ठांकडे पाठविण्यात येईल. मदतकार्य शक्य तितक्या लवकर सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.स्थानिक नागरिकांकडून आता प्रशासनाने या निवेदनाची दखल घेऊन तातडीने मदतकार्य सुरू करावे अशी मागणी होत आहे. पूरग्रस्त कुटुंबांना निवारा, अन्नधान्य औषधे आणि आर्थिक मदत देणे आवश्यक असल्याचे मत



मादळमोही /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मादळमोही येथे नाथ संप्रदायातील रंग रंगनाथ महाराजांची रंगनाथ महाराजांची संजीवन समाधी असून भव्य दिव्य मंदिर बांधण्यात आले आहे रंगनाथ महाराज संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. गुरुवर्य कृष्णा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिपुरारी पौर्णिमा निमित्त माद‌ळमोही ते गाणगापूर पायी वारीचे आयोजन करण्यात आले होते.पायी दिंडीची सुरुवात दिनांक २७/ १०/ २०२५ रोजी माद‌ळमोहीतून सकाळी दहा वाजता गाणगापूर मार्गे प्रस्थान झाले असून,ही दिंडी बीड चौसाळा धाराशिव तुळजापूर मार्गे गाणगापूर या ठिकाणी त्रिपुरारी पौर्णिमेला पोहोचली . दिंडीमध्ये नाथ भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले नाम घोषाच्या गजरात पायी दिंडी गाणगापुरात पोहोचली दत्त महाराजांचे दर्शन घेऊन माद‌ळमोही कडे दिनांक ८/१ /२०२५ रोजी संध्याकाळी सात वाजता माद‌ळमोही येथे आगमन झाल्यानंतर भाविकांच्या व गावकऱ्यांच्या वतीने दिंडीतील भाविकांचे वाजत गाजत स्वागत करण्यात आले यावेळी स्वागताला नाथ भाविक भक्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाबासाहेबांचे जीवन समजून घेतल्यास प्रत्येकात समाज बदलण्याची ताकद – विचारवंत जगदीश ओहोळ

बीड ।प्रतिनिधी

बाबासाहेबांचे जगणं म्हणजे संघर्ष, शिक्षण आणि परिवर्तनाचा प्रवास. प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचे जगणं समजून घेत तो आपल्या जीवनात उतरवला, तर समाज बदलण्याची ताकद प्रत्येकात निर्माण होईल, असा भावस्पर्शी संदेश प्रसिद्ध लेखक आणि विचारवंत जगदीश ओहोळ यांनी दिला.

हा संदेश त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित विशेष व्याख्यानात दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, तर प्रमुख अतिथी म्हणून उमेश सोनवणे, प्रा. राम गायकवाड, प्रा. प्रदीप गाडे आणि मा. भारत मगर उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विचारप्रवर्तक मतं मांडत समाजपरिवर्तनात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

दरम्यान, नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शिक्षक वक्तृत्व स्पर्धा ९ नोव्हेंबर २०२५ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात पार पडली. राज्यातील विविध जिल्ह्यांतील शिक्षकांनी उत्साहपूर्वक सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्यांना मुख्य वक्ते मा. जगदीश ओहोळ यांच्या हस्ते पारितोषिके व प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली. प्रथम क्रमांक: रायगडचे प्रेमनाथ पाटील (२५,०००), द्वितीय क्रमांक: बीडचे श्रीराम जाधव (१५,०००) तृतीय क्रमांक: बीडचे कैलास तुपे (१०,०००) सर्व विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी व्याख्यान व स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांना आवाहन केले की, जीवनात यश मिळवण्यासाठी कठीण परिश्रम आणि शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही, असे नमूद केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विकास वाघमारे, सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे, तर आभार प्रदर्शन प्रा.विद्या अवघडे यांनी मानले. तुलसी शैक्षणिक समूहातील प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# शिवतीर्थ गृहप्रवेश व छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अनावरण समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - दत्ता काकडे

आष्टी - (प्रतिनिधी)

शिवतीर्थ या नुतन वास्तुचा गृहप्रवेश आणि हिंदवी स्वराज्य संस्थापक, शौर्य, पराक्रम आणि प्रजाहित दक्षतेचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा अनावरण समारंभ त्यानिमित्त मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान संवाद मेळावा शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२.०५ वा. शिवतीर्थ, खडकत रोड, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे आयोजित केला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. ना. प्रा. राम शिंदे



साहेब, सभापती - विधान परिषद महाराष्ट्र राज्य मुंबई हे उपस्थित राहणार असून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अनावरण मा. ना. शिवेंद्रराजे भोसले महाराज साहेब, मंत्री - सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या शुभहस्ते होणार होणार आहे. यानिमित्ताने आयोजित पंचायतराज अभियान संवाद मेळाव्याचे उद्घाटक मा. ना. जयकुमार गोरे साहेब, मंत्री - ग्रामीण विकास विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असून यावेळी प्रमुख पाहुणे पद्मश्री म्हणून मा. पोपटराव पवार, कार्याध्यक्ष, आदर्श गाव योजना महाराष्ट्र राज्य, मा. खा. बजरंग सोनवणे, खासदार - बीड, खा. नीलेश लंके, खासदार - अहिल्यानगर, मा. खा. नितीन (काका) पाटील, राज्यसभा सदस्य, मा. आ. श्रीकांत भारतीय, विधान परिषद सदस्य, मा. मल्लिनाथ कलशेट्टी, उपमहासंचालक - यशदा पुणे हे उपस्थित राहणार आहेत.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. आ. सुरेश धस, विधानसभा सदस्य - आष्टी तथा माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य हे उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळयास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन दत्ता काकडे (प्रदेशाध्यक्ष, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र) यांनी केले आहे.

# सरकारी कामगार अधिकारी यांना राष्ट्रीय बालकामगार शिक्षक कर्मचारी संघटना चे निवेदन

वडवणी /प्रतिनिधी

आज दिनांक ११/११/२०२५ मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड व सरकारी कामगार अधिकारी साहेब यांना निवेदन सादर.बीड येथे राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शिक्षक कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा च्या वतीने दिनांक ०३/१०/ २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर लाक्षणिक एकदिवसीय उपोषण करण्यात आले होते.तसेच संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय समोर एकदिवसीय लाक्षणिक आंदोलन करण्यात आले होते.व राज्यातील लोकप्रतिनिधी खासदार, आमदार यांचे शिफारस पत्र जोडून निवेदन दिले होते.यांची दखल घेऊन महाराष्ट्र



शासनाच्या कामगार विभाग, कामगार आयुक्त कार्यालय मुंबई यांनी महाराष्ट्रातील अप्पर कामगार आयुक्त प्रत्येक विभागाला पत्र पाठवून महाराष्ट्रातील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प तसेच बालकामगार विशेष प्रशिक्षेण केंद्रातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांची जिल्हा निहाय कर्मचारी ची संख्या, प्रकल्प बंद झाला त्यावेळीची कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची पदनिहाय संख्या याबाबत ची माहिती मागितली होती ती आज बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प व बालकामगार विशेष प्रशिक्षेण केंद्र बीड जिल्ह्यात २००५ प्रकल्प २०२२ पर्यंत प्रकल्प चालू होता . प्रकल्प बंद पडला त्यावेळी ची कार्यरत शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची पदनिहाय, संख्या, माहिती मा.सरकारी कामगार अधिकारी साहेब यांना माजी प्रकल्प संचालक तथा भाजपा कामगार मोर्चा बीड जिल्हा अध्यक्ष ओमप्रकाश गिरी साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच राज्य सचिव शंकर झाडे सर, बीड जिल्हा उपाध्यक्ष संजय साबळे सर, शेख ताहेर सर, अंनता मुंडे सर, यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.व तात्काळ माहिती कामगार आयुक्त कार्यालय मुंबई ला पाठविण्यात यावे अशी विनंती करण्यात आली.



बीड - चंद्रकांत नाना जोशी यांच्या नवीन प्रतीक्षा इलेक्ट्रॉनिक्स या इलेक्ट्रिक दुकानाच्या उद्घाटन प्रसंगी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना अँड. विलास जोशी,अँड. नरेंद्र होळकर, डॉ.प्रशांत देशपांडे.

# प्र.केंद्रप्रमुख ज्ञानोबा रेपे यांचा सेवापूर्ती गौरव

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मानेवाडी प्राथमिक शाळेचे सहशिक्षक ज्ञानोबा पंढरीनाथ रेपे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा सोमवार रोजी संपन्न झाला.गुरुजींनी दिलेल्या संस्कारामुळेच अनेक विद्यार्थी घडले असे मत रमेशराव आडसकर यांनी व्यक्त केले ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मानेवाडी येथील सेवा गौरव कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर,प्रमुख पाहुणे माजी उपसभापती ऋषिकेश आडसकर, रंजित भैय्या आडसकर, गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे,सरपंच शशिकांत इंगळे,उपसरपंच दिगंबर वाघमारे,डॉ.हनुमंत सौदागर,सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक बलभीम रेपे,बाबासाहेब शिनगारे, सय्यद हकीम,सदाशिव थोरात,राजेश देशमुख,एम डी शेख,महेश सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलतांना



गुरुजींनी दिलेल्या संस्कारामुळे अनेक विद्यार्थी घडले –रमेशराव आडसकर

आडसकर म्हणाले की, त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रामाणिक सेवा केली पुढील सेवा पूर्ती नंतरच्या आयुष्या मध्ये पर्यटन करावे, निरोगी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

ऋषिकेश आडसकर म्हणाले की,रेपे गुरुजींनी चांगले विद्यार्थी घडवले,

चांगली सेवा दिली म्हणून त्यांची मुले डॉक्टर, इंजिनिअर घडली असे मत व्यक्त केले.शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ आहे.त्यांनी घडवलेले अनेक विद्यार्थी देशासाठी योगदान देतील असे मत व्यक्त केले.डॉ.हनुमंत सौदागर म्हणाले की, शिक्षकांच्या जीवनात सेवापुर्तीनंतर विद्यार्थ्यांच्या आठवणी विसरता येत नाहीत. यापुढे सामाजिक कार्यात झोकून देऊन सेवा करावी असे मत व्यक्त केले.गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे म्हणाले रेपे यांनी आदर्श शिक्षकासारखे काम केले असे मत व्यक्त केले.यावेळी केंद्राच्या वतीने ज्ञानोबा रेपे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या.कार्यक्रम यशस्वीतेसाठी केंद्रीय मुख्याध्यापक सुनील वैरागे,मुख्याध्यापक युवराज हिरवे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष लक्ष्मण माने, पवन माने आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास विद्यार्थी पालक शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धम्मसेवक ग्रुपच्यावतीने डॉ. अनुजा कांबळे यांचा सत्कार संपन्न

लातूर ।प्रतिनिधी

पूजनीय भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली लातूरमध्ये बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी धम्मसेवक ग्रुपची स्थापना करण्यात आली. ग्रुपच्यावतीने. दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालय, लातूर येथील प्रा. अनुजा अरुण कांबळे ( धायगुडे) यांनी खारिर्ली ष चेव-शीप ढशलहपेश्रेसू`प ऊाशीलश रपव चरपरसश-ाशपीं एर्वीलरींळेप झीश रपव झींीं उजतखऊ-१९ या विषयावर संशोधन करून पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांचे संशोधन आधुनिक तंत्रज्ञानाचा वाणिज्य आणि व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रावर झालेल्या प्रभावावर आधारित आहे. या यशाबद्दल त्यांचा एका कार्यक्रमांमध्ये सत्कार करण्यात आला. त्यांना कन्हैय्या लाल जोशी रात्रीचे वाणिज्य कॉलेज, लातूर येथील डॉ. सुजाता एन. चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सत्यवान कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे, ज्योतीराम लामतुरे, मिलिंद धावारे यांची प्रमुख उपस्थिती होती. साथिया फोटो स्टुडिओचे बालाजी धायगुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हर्षलता धायगुडे, राजा धायगुडे, अरविंद कांबळे, शितल कांबळे, दिपाली कांबळे, रेशमा काकडे, सुषमा चिकाटे, स्वप्नील बनसोडे, अरुण कांबळे, अँड अभी कांबळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वडवणी /प्रतिनिधी

महाराष्ट्र हे देशातील एक विकासभि प्रमुख, प्रगतशील विचाराचे राज्य आहे, भटके विमुक्त जाती व जमाती यांचे अंदाजित लोकसंख्या, एकूण राज्याच्या लोकसंख्येपेक्षा अकरा टक्के पेक्षा जास्त आहे, देशाला स्वातंत्र्य होऊन ७५ वर्षे झाली, तरी भटके विमुक्त जातीसाठी, स्वातंत्र्य धोरण नाही, भटके विमुक्त जातीसाठी महाराष्ट्र शासनाने, स्वातंत्र्य धोरण आखावे, अशी विनंती भटके विमुक्त परिषद करीत आहे, भटके विमुक्त जातीकडे कागदपत्राचा अभाव असल्यामुळे, या योजनेचा त्यांच्यापर्यंत लाभ पोहोचत नाही, राजे उमाजी नाईक कागदपत्र अभिनयाच्या माध्यमातून, भटके विमुक्त जातीच्या वस्तीवर अनेकांना घरुकुल नाहीत अनेकांना पिण्याची पाण्याची व्यवस्था नाही, अनेक जणांचे सामाजिक प्रश्न आहेत, याच पार्श्वभूमीवर भटके विमुक्त जातीचा राज्य सरकारने विचार करावा महाराष्ट्र राज्य सरकारने, यांच्यासाठी विशेष स्वातंत्र्य धोरण तयार करावे, अशी निवेदनाद्वारे मागणी वडवणी तहसीलदार यांना करण्यात आली आहे, यावेळी निवेदन देताना विमुक्त जाती भटके विमुक्त जातीचे पदाधिकारी, सचिन काळे, सिद्धेश्वर नाईकवाडे ,अशोक चादर, आदी उपस्थित होते,

# नांदेड मनपा मध्ये एकूण नगरसेवक संख्या ८१ तर प्रभाग २० यामध्ये महिला साठी ४१ जागा राखीव तर पुरुष साठी ४० जागा राखीव

नांदेड / अनिल धमने पाटील

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या येणाऱ्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज प्रभाग नियम आरक्षण सोडत काढण्यात आली असून यामध्ये २० प्रभागातील ८१ नगरसेवकांसाठी ही सोडत होती यापैकी ४१ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या तर पुरुषासाठी ४० जागा राखीव ठेवण्यात आल्या या सर्व आरक्षण सोडतीचे पारदर्शकपणे लहान बालकाच्या हस्ते चिठ्ठी पद्धतीने आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली .

नांदेड येथील डॉक्टर शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे मनपाचे आयुक्त डॉक्टर महेश कुमार डोईफोडे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम उपा आयुक्त अजितपाल सिंघ संधू यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रभागाचे प्रभारी अधिकारी नितीन गाढवे यांनी आरक्षणाचा सर्व मसुदा मांडला २०११ च्या लोकसंख्येनुसार नांदेडची लोकसंख्या ५ लाख ५० हजार ४३९ एवढी आहे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या एकूण २० प्रभागात ८१ नगरसेवक उमेदवार निवडून द्यायचे असून त्यातील ४१ महिला आहेत यामध्ये एकूण प्रभाग २० आहेत १९ प्रभागात चार नगरसेवक संख्या आहे तर प्रभाग क्रमांक २० मध्ये पाच नगरसेवक निवडून द्यायचे आहेत प्रभाग निहाय आरक्षण पुढीलप्रमाणे भाग क्रमांक १) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक २) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास प्रवर्ग क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ३) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागासवर्व सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ४) अनुसूचित जाती पुरुष व अनुसूचित जमाती महिला क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्र ५) अनुसूचित जाती पुरुष व नागरिकांचा मागासपरवर महिला क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ६) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास करून सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ७) अनुसूचित जाती पुरुष व नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ८) अ अनुसूचित जाती पुरुष व नागरिकांचा मागासवर्ग महिला क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ९) व अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास करून पुरुष सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १०) अ अनुसूचित जाती पुरुष व नागरिकांचा मागास पर्व महिला क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ११) व नागरिकांचा मागास बरोबर व सर्वसाधारण महिला क आणि ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १२) व नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष व आणि क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १३) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागासवर्ग महिला क आणि ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १४) अनुसूचित जाती पुरुष व नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १५) व नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष व आणि क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १६) अ नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष व आणि क सर्वसाधारण महिला महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १७) व नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला क आणि ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १८) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १९) अनुसूचित जाती पुरुष व अनुसूचित जात जमाती पुरुष व नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला ड सर्वसाधारण महिला प्रभाग क्रमांक २०) जो की पाच उमेदवाराचा प्रभाग असून पाच नगरसेवक निवडून द्यायचा आहे त्यात अ अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला क नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष ड सर्वसाधारण महिला ई सर्वसाधारण पुरुष आदींची आरक्षण सोडत राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पार पडली आहे



# गंगाधर ढवळे यांना व्हाईस ऑफ मीडियाचा उत्कृष्ट पदाधिकारी पुरस्कार जाहीर

## पंढरपूरच्या राज्य अधिवेशनात होणार गौरव


नायगाव :-व्हॉइस ऑफ मीडिया आणि विवो एम इंटरनॅशनल फोरम या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या वतीने दिले जाणारे उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्ष पदाधिकारी पुरस्कार २०२५ जाहीर झाले आहेत यामध्ये नायगाव तालुका अध्यक्ष गंगाधर ढवळे यांना व्हाईस ऑफ मीडियाचा उत्कृष्ट पदाधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे

संघटनेचे मुख्य संयोजक तथा संचालक गोरक्षनाथ मदने यांनी आज पत्रकार परिषदेत ही घोषणा केली जगातील ५६ देशांमध्ये कार्यरत आणि चार लाख ७० हजार पत्रकार सदस्य संख्या असलेल्या जगातील क्रमांक एक पत्रकार संघटनेचे राज्य शिखर अधिवेशन येत्या १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथील इस्कॉन सभागृहात होत आहे या अधिवेशनात निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा गौरव प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे या निवड प्रक्रियेत प्रत्येक विभागातून एक जिल्हाध्यक्ष आणि एक तालुकाध्यक्ष यांची उत्कृष्ट कार्यासाठी निवड करण्यात



आली आहे. जिल्हाध्यक्षांमध्ये व्यंकटेश धुडुमवार गडचिरोली, राजेश भालेराव जालना, रमाकांत पाटील नंदुरबार, अनिल करंदकर सातारा, मंगल डोंगरे ठाणे, रुपेश पाटील सिंधुदुर्ग यांचा समावेश आहे तर तालुकाध्यक्ष म्हणून राजू कापसे रामटेक, गंगाधर ढवळे नायगाव, उमेश काटे अमळनेर, गणेश आवळे मिरज, आणि भारत महात्रे वसई यांची निवड झालेली आहे.

# सीसीटीव्हीच्या निगराणीखाली स्वारातीम विद्यापीठ अंतर्गत हिवाळी - २०२५ परीक्षा सुरू




नांदेड /जिल्हा प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत हिवाळी २०२५ पदवी परीक्षा आज, दि. ११ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झाल्या आहेत. परिक्षेत्रातील नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या चारही जिल्ह्यांतील एकूण १२४ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्हीच्या सतत निगराणीखाली परीक्षा पार पडत आहेत.

विद्यापीठाशी संलग्न ४०५ महाविद्यालयांमधील सुमारे एक लाख वीस हजार विद्यार्थी विविध शाखांच्या परीक्षेत सहभागी झाले आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान, मानव विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन तसेच आंतरविद्याशाखीय अभ्यास मंडळ या शाखांतील विविध विषयांच्या परीक्षा सुरू आहेत. कॉपीमुक्त परीक्षा धोरण प्रभावीपणे राबवण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही प्रणाली बसविण्यात आली आहे. विद्यापीठातील अधिष्ठाता आणि टेक्निकल टीममार्फत सर्व परीक्षा कक्षांमध्ये सुरू असलेल्या प्रक्रियेवर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे. निवडणुक आणि सुट्टीचे दिवस वगळता परीक्षा सुरळीत पद्धतीने पार पडत आहेत. परीक्षेचा निकाल अचूक व वेळेवर जाहीर होण्यासाठी १०० केंद्रांवर संगणकीय पद्धतीने मूल्यांकन करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थी व महाविद्यालयांना तात्काळ व विश्वसनीय निकाल उपलब्ध होणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर आणि डॉ. पराग खडके हे अनुक्रमे लातूर, परभणी (हिंगोली) व नांदेड जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर देखरेख करीत आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यांकन मंडळाचे प्रभारी संचालक हुशारसिंग साबळे यांनी कळविले आहे.

# सकल मराठा समाजाचा एक दिवसीय धरणे आंदोलन समाज

नांदेड /प्रतिनिधी

अखंड मराठा समाजाचे दैवत मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचणाऱ्या माजी मंत्र्यासह सर्व आरोपीची कसून चौकशी करण्यात यावी व या प्रकरणाची सत्यता महाराष्ट्राच्या समोर यावी यासाठी आज नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकल मराठा समाजाच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

मराठा आरक्षणाचे प्रणेते पाच कोटी मराठा समाजाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी पोट तिडके ने लढा देणारे मराठा नेते मनोज दादा जरांगे पाटील हे आता एक नाव राहिले नसून अखंड मराठा समाजासाठी दैवत बनलेले आहेत,आपल्या शरीराची चाळणी करीत समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी वेगवेगळे आंदोलने आणि उपोषणे करून समाजाला न्याय मिळवून दिला.अशा प्रामाणिक आणि इमानदार नेतृत्वाला कायमचे संपवण्यासाठी काही समाजविघातक लोकांनी कट रचल्याची बातमी टीव्ही चॅनलच्या माध्यमातून




कानावर पडतात राज्यभरातील मराठा समाजाच्या भावना अतिशय तीव्र झाल्या आणि जिल्हा जिल्ह्यातून मराठा बांधव आंतरवाली कडे कुच करू लागले आंतरवालीत पोहोचल्यानंतर मनोज दादा जरांगे पाटील यांच्या माध्यमातून काही गोष्टी कानावर आल्या या गटामध्ये राज्याचे माजी कृषी मंत्री आणि परळी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार धनंजय मुंडे यांचा थेट समावेश आहे, सद्द स्थितीत पोलीस चौकशी सुरू आहे दोन आरोपी ताब्यात घेतले आहेत आमचे मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की तपास हा एसआयटी मार्फत करून यातील सत्य बाहेर आले पाहिजे उर्वरित आरोपींना सुद्धा तात्काळ अटक झाली पाहिजे आणि या कटाच्या पाठीमागे पुराव्यानिशी सर्व चौकशीअंति माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा जर का हस्तक्षेप असेल आणि कटाचा मुख्य सूत्रधार तो असेल तर राज्यातील मराठा समाज परळीच्या दिशेने कुच केल्याशिवाय स्वस्त बसणार नाही कारण शेवटी प्रश्न हा पाच कोटी मराठ्यांच्या अस्मितेचा आहे अस्तित्वाचा आहे आणि आमच्या नेतृत्वाचा आहे अखंड हिंदोस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारावर चालणारे आणि कुठल्याच समाजाविषयी अपशब्द न बोलणारे मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या केसालाही धक्का लागला, तर महाराष्ट्रातील कायदा सुव्यवस्था विसरून मराठा समाज रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही म्हणून या प्रकरणाची माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सखोल अशी चौकशी करून दोषीनविरुद्ध कडक कार्यवाही करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन सकल मराठा समाज नांदेड जिल्ह्याच्या वतीने मुख्यमंत्री महोदयांना जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत पाठवण्यात आले व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करत कट रचणाऱ्या च्या विरोधात घोषणा बाजी करून निषेध व्यक्त करण्यात आला.

# आ. राजेश पवारां ना वाटलं,खंडोबा आशीर्वाद देईल,पण असा बालीस.पणा केलं तर अंगलटच येईल

नायगाव /प्रतिनिधी

आपल्या गावचं काही देणे लागतो म्हणून या भावने पोटी मौजे घुंगराळा येथील राष्ट्रवादीचे युवा नेते तथा गावचे उपसरपंच वसंत पा.सुगावे यांनी दोन वर्षांपूर्वीच आपल्या गावातील खंडोबा माळसाकांत मंदिराच्या विविध कामासाठी एक कोटी ७५ लाख रुपये चा निधी शासनाकडून प्राप्त करून आपल्या गावातील ग्राम दैवताचे काही टक्के कामही करण्यात आले पण विद्यमान आ.राजेश पवार यांनी काम फतेह अवघ्या पंधरा तासांमध्येच हा निधी आपण उपलब्ध केलेला आहे अशी बॅनरबाजी केली यामुळे त्यांना घुंगराळा येथील खंडोबा दैवत आपणास आशीर्वाद देईल असे वाटले होते पण जीआर ची प्रतच वसंत सुगावे यांनी काढल्यावर आमदार महोदयाचा बालीस.पणा त्यांच्या अंगलट येतोय असे सद्यस्थितीत दिसून येते.

नायगाव मतदारसंघाचे आ. राजेश पवार यांनी घुंगराळा येथील माळसांकात मंदिर परिसरात मंगल कार्यालयासह इतर विकासासाठी आपण अवघ्या पंधरा तासात एक कोटी ७५ लाखाचा निधी आणलो काम फत्तेह म्हणून बॅनरबाजी केली पण हा आमदार राजेश पवारांचा बालिशपणा काही नवीन नाही गेल्या चार दिवसापूर्वीच तहसीलदार डॉ.धम्मप्रिया गायकवाड हे आपल्या सासऱ्यांचे निधन झाल्याने रजेवर असताना तिथे आ. पवार जाऊन खुर्चीला पुष्पहार टाकून आपली स्टंटबाजी केली. यंदाच्या पूर परिस्थितीमुळे अक्षराच्या शेतकऱ्याचे कंबरडे मोडले त्यांच्यावर अस्मानी संकट कोसळली या पूर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार अतुल सावे यांचा ३० ऑगस्ट रोजी दौरा विविध ठिकाणी जाऊन पाहणी केली शेतकऱ्यांचे अश्रू पुसले त्यांच्या समावेश येतील स्थानिक आमदार या नात्याने राजेश पवार हे राहणे गरजेचे होते पण आमदार महोदय विदेश दौऱ्यावर होते. परवाच नरसी येथे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी आढावा बैठक घेण्यात आली तेथील गटबाजी जाहीर रित्या उघड झाली नायगाव मतदारसंघात भाजपा मोठे करण्यात बालाजी बच्चेवार व श्रावण पाटील भिलवंडे यांचे मोठे योगदान आहे आपल्या भांडवली बळावर राजेश पवार पुढे आले उद्या अजून कोणीतरी येईल पण इथे निष्ठावंत म्हणून बच्चेवार व भिलवंडे पाटील यांचेच नाव कायम राहील आमदार राजेश पवार कोण्या तोऱ्याने चालतात हे समजणे गरजेचे आहे. शोले या दर्जेदार चित्रपटात असरानी हा जेलरची भूमिका करीत असतो आणि जेलमध्ये एक फर्मान सोडतो.. तुम कान खोलकर सुनलो... तुम लोग कभी नही सुधार सकते.. नहीं... नहीं .... नहीं...अरे जब हम नहीं सुधरोंगे.. तो तुम क्या सुधार जाओगे... असेच आमदार पवार यांच्या बाबतीत म्हणावे लागेल राजेश पवारांना आपण एक आमदार नात्याने परिवर्तन करायचे असेल तर अगोदर आपले वर्तन बदलणे गरजेचे आहे स्टंटबाजी करणे बॅनरबाजी करणे आपणच व्हिडिओ काढून सोशल मीडियावर टाकणे म्हणजे हे परिवर्तन नव्हे आपला नौटंकीपणा लवकरच बाहेर येतो घुंगराळाच्या बॅनरबाजी वरून आमदार राजेश पवार तोंडघशी पडले आहेत कारण तेथील राष्ट्रवादीचे युवा नेते उपसरपंच वसंत सुगावे यांचे श्रेय असताना आपण लुडबुड कशासाठी व का करायची याने लोकच काय श्री खंडोबाराया ही आशीर्वाद देत नाही .पण आमदार महोदय काम फत्तेह होऊ द्या तेही अवघ्या पंधरा तासातच होऊ द्या आपला मतदारसंघ विकासाबाबत खूपच मागे राहिला हो.....




गेल्या आठवड्यात राष्ट्रवादीची नायगाव येथे आढावा बैठकीत माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर जाहीर रित्या बोलले की आ.राजेश पवार टक्केवारी घेतल्याशिवाय कामेच करीत नाही मग असे कारनामे असलेले आ.राजेश पवार दुसऱ्यांदा निवडूनच आले कसे हेच तर सर्वांना कळेनासे झाले म्हणून हाल असे...

# शेख रज्जाक यांची राष्ट्रवादी किसान सभेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी आणि मराठवाडा पूर्व विभाग प्रमुखपदी निवड

फारुक शेख :- शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी झटणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेला नवे बळ मिळाले आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष ड.वसंत मानकर यांनी शेख रज्जाक यांची किसान सभा प्रदेश उपाध्यक्षपदी तसेच मराठवाडा पूर्व विभाग प्रमुखपदी नियुक्ती केली आहे.

या नियुक्तीमुळे मराठवाडा विभागात राष्ट्रवादी किसान सभेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होईल असा ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.पक्षाचे ध्येय-धोरणे सर्वसामान्य शेतकरी व ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचविणे तसेच शेतकऱ्यांच्या जीवनात सुख-समृद्धी आणि आत्मनिर्भरता आणणे या उद्देशाने शेख रज्जाक आगामी काळात आक्रमकपणे जनतेमध्ये काम करतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.नियुक्तीबद्दल बोलताना शेख रज्जाक यांनी सांगितले की राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा ही शेतकऱ्यांचा आवाज बुलंद



करणारी संघटना आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे लढा देणार आहे.

मराठवाड्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य आणणे हेच माझे ध्येय आहे.या नियुक्तीबद्दल मराठवाडा परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून किसान सभेची संघटनात्मक ताकद अधिक जोमाने वाढेल असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# बारसवाडाचा कृष्णा मुळक राष्ट्रीय पातळीवर चमकला कर्नाटक नॅशनल स्पर्धेसाठी निवड ग्रामस्थांचा अभिमान उंचावला

अंबड /प्रतिनिधी :- मौजे बारसवाडा या छोट्याशा गावातील कृष्णा राम मुळक या होतकरू खेळाडूने आपल्या चिकाटीच्या बळावर राज्याच्या पलीकडे झेप घेतली आहे. दि.८ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या कर्नाटक नॅशनल खो-खो स्पर्धेसाठी कृष्णा मुळक याची भव्य निवड झाली असून संपूर्ण पंचक्रोशीत अभिमानाची लाट उसळली आहे.कृष्णा मुळक यांनी आपले प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारसवाडा येथे इयत्ता सहावीपर्यंत पूर्ण केले.त्यानंतर खेलो इंडिया या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रीय क्रीडा उपक्रमांतर्गत झालेल्या निवड प्रक्रियेतून जिल्हा क्रीडा कार्यालय, जालना येथे त्याची निवड झाली.ग्रामस्थांच्या आर्थिक सहाय्याने आणि स्वतःच्या कठोर परिश्रमावर त्याने खो-खो खेळाचे सखोल प्रशिक्षण घेतले.सन २०२४ मध्ये साई स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया पांडेचेरी या प्रतिष्ठित संस्थेत त्याला प्रवेश मिळाला. प्रयत्नांती परमेश्वर या म्हणीची प्रचिती देत अथक परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर त्याने यश संपादन करत २०२५ साठी कर्नाटक,बेंगळुरू टीममध्ये राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.या उल्लेखनीय यशामागे बारसवाडा येथील कोच व सेवानिवृत्त शिक्षक श्री सुभाष चाटे सर,श्रीधर कुलकर्णी सर, तसेच जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक श्री गोल्हार सर,श्री बोंबलत सर,श्री सावंत सर,श्री जाधव सर व जाधव मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



यशाचा हा सोहळा ग्रामस्थांनीही मोठ्या आनंदात साजरा केला. ज्येष्ठ समाजसेवक किसन तात्या गायकवाड,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष राधाकिसन सावंत,उपाध्यक्ष आबासाहेब शिंदे,सोसायटी चेअरमन अर्जुनराव गायकवाड,तसेच ग्रामपंचायत सदस्य गजानन चिंतामणी,रामभाऊ सुळे,राम चव्हाण,नाथा मिठे,बद्री गायकवाड,करणभैय्या मिठे,डॉ. शुभम मिठे,भगवानदादा कापरे व पत्रकार पंढरीनाथ माळकरी यांनी कृष्णा मुळक याचे मनःपूर्वक अभिनंदन केले.




माहूर/प्रतिनिधी

माहूर पोलीस स्टेशनला आलेले नूतन पोलीस निरीक्षक देविदास चोपडे पदभार स्वीकारल्यानंतर रविवार दि.९ नोव्हेंबर २०२५ रोजी पोलीस स्टेशन हद्दीतील गावामध्ये भेट दिली असता आपल्या गावातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आव्हान पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी ईवळेश्वर येथील गावकऱ्यांना सांगितले.

गावातील छोटे मोठे वाद,तंटे गावामध्येच मिटवून घ्यावे जेणेकरून पोलीस प्रशासनाचा वेळ वाया घालू नये गावातील अवैध दारू विक्रीवर आळा घालण्यात यावे जेणेकरून गावात तंटे भानगडी निर्माण होणार नाही.याची दक्षता सर्व इवळेश्वर गावकऱ्यांनी घ्यावी.